- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

# दैनिक सिंहवाणी वृत्त

प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर | संचालक-संपादक : अजय बिवडे

**सोने-चांदी**
- ✔ २४ कॅरेट : १,५८,७०० /-
- ✔ २३ कॅरेट : १,५६,३५० /-
- ✔ चांदी : २,७८,३००/-

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
© 7796116694
© 9730107075

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : बुधवार, २ सप्टेंबर २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २६३ | किंमत : २ रूपये

# एका क्लिकवर मिळणार आता जमिनीचा 'सर्च रिपोर्ट'



**वृत्तसंस्था, मुंबई**

महाभूमी स्टॅक प्रणालीमुळे राज्यातील सर्व जमिनीच्या मालकीहक्काची संपूर्ण माहिती एका क्लिकवर उपलब्ध होणार असून यामुळे राज्यातील गुंतवणूक आणि आर्थिक विकासाला चालना मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

महाराष्ट्र राज्य शासनाच्या महसूल व वन विभागामार्फत विकसित करण्यात आलेली भूमी प्रशासनासाठीच्या महाभूमी स्टॅक प्रणालीचा राज्यमंत्रिमंडळ बैठकीनंतर प्रारंभ करण्यात आला. याप्रसंगी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. याबाबत महसूल विभागाचे अप्पर मुख्य सचिव विकास खारगे यांनी सादरीकरण केले. जमिनींचे खरेदी-विक्रीचे व्यवहारात आणि व्यवहारानंतर अनेक बाबतीत नागरिकांना महाभूलेख, महाभूनकाशा, आयडीआरएस यासारख्या विविध प्रणालींची मदत घ्यावी लागते. या सर्व विखुरलेल्या प्रणालीचे एकत्रीकरण करून दहा प्रमुख भूमी सेवा श्रेणींसाठी एकच एकात्मिक डिजिटल प्रवेशद्वार महाभूमी स्टॅकच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात आली आहे. राज्याच्या महसूल आणि जमीनविषयक सुधारणामधील हा अतिशय महत्वाचा टप्पा आहे असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

**सेवेचा लाभ घेण्याचे आवाहन**

राज्य शासनाने ईज ऑफ लिव्हिंग आणि ईज ऑफ डुईंग बिझनेस धोरण स्वीकारले आहे. महाभूमी स्टॅक प्रणाली या धोरणाच्या अनुषंगानेच आहे. महसूल विभागाने या प्रणालीचा अतिशय प्रभावीपणाने वापर करावा, त्याचबरोबर नागरिकांनी या सेवेचा लाभ घ्यावा, यासाठी विशेष प्रयत्न करावे, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

**महाभूमी स्टॅक प्रणालीतील अभिलेखांचे डिजिटल भांडार**

- ३.५ कोटींहून अधिक अधिकार अभिलेख (७/१२ व ८-अ)
- १.५ कोटीहून अधिक भू-नकाशे व मिळकत पत्रिका
- ४० कोटींहून अधिक ऐतिहासिक स्कॅन केलेले फेरफार व जुने अभिलेख
- नोंदणी विभागाचे दस्त क. २ च्या प्रती व महसूल न्यायालयीन प्रकरणांची अद्ययावत स्थिती

**प्रणालीचे प्रमुख वैशिष्ट्य**

ग्रामीण भागासाठी सर्व्हे/गट क्रमांक आणि शहरी भागासाठी सी.टी.एस./सिटी सर्व्हे क्रमांक टाकताच, त्या विशिष्ट भू-खंडाशी संबंधित सर्व माहिती एकत्रित स्वरूपात प्राप्त होणार.

- त्या भू-खंडाचे सध्याचे वापरकर्ते व अधिकार अभिलेख (७/१२)
- त्या भू-खंडावर झालेले मागील सर्व फेरफार
- त्या भू-खंडाशी संबंधित नोंदणीकृत व्यवहार संदर्भ (दस्त क्र. २)
- भूमापन विषयक माहिती, गाव नकाशा व मोजणी तपशील उपलब्ध होणार

**पारदर्शकता व फसवणुकीस आळा**

कोणताही भू-खंड खरेदी-विक्रीपूर्वी नागरिक स्वतः च मोबाईलवर पडताळणी करू शकतात की, त्या भू-खंडाचे सद्य वापरकर्ते कोण आहेत, त्यावर कोणते बोजे आहेत का, कोणती न्यायालयीन प्रगती आहे का. यामुळे मध्यस्थांवरील अवलंबित्व कमी होईल.

**एकच खिडकी, अनेक सेवा**

७/१२ उतारा, ८-अ उतारा, नकाशा, फेरफार स्थिती, मोजणी अर्ज, दस्त शोध अशा विविध सेवांसाठी वेगवेगळ्या पोर्टलवर आणि कार्यालयांमध्ये जाण्याची आवश्यकता राहणार नाही.

**वेळ, श्रम व खर्चाची बचत**

आवश्यक असलेले सर्व भूमी अभिलेख घरबसल्या उपलब्ध होतील. बँक कर्ज किंवा इतर शासकीय योजनांसाठी हेच अभिलेख डिजिटल पद्धतीने सुरक्षितपणे सामायिक करता येतील.

**ग्रामीण व शहरी दोन्ही क्षेत्रांसाठी समान सुविधा**

ग्रामीण नागरिकांना गट क्रमांकाने तर पुणे, मुंबईसारख्या शहरी भागातील नागरिकांना सी.टी.एस. क्रमांकाने त्यांच्या मिळकतीची माहिती सहज शोधता येईल.

**प्रशासन, संस्थांसाठी लाभ**

महसूल प्रशासनास पडताळणी व निर्णय प्रक्रिया अधिक गतिमान करता येईल. बँका व वित्तीय संस्थांना कर्ज मंजुरीपूर्वी भू-खंडाच्या वापरकर्त्यांची व व्यवहाराची त्वरित खातरजमा करता येईल. उद्योग व गुंतवणूकदारांना भूमी विषयक स्पष्टतेमुळे गुंतवणूक करणे अधिक सुलभ होईल.

थोडक्यात

## सुटे तेल विक्रीला वर्षाची मुदतवाढ

**मुंबई :** सनदी अधिकारी तुकाराम मुंढे अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त झाल्यापासून राज्यात खाद्यपदार्थातील भेसळ कमी झाली आहे. खाद्यपदार्थातील भेसळ, निकृष्ट दर्जाचे जेवण आढळताच तुकाराम मुंढे थेट कारवाई करताना दिसत आहेत. त्यांनी काही दिवसांपूर्वी सुट्ट्या तेलाची विक्री बंद केली. खाद्यतेलाची विक्री करताना तेलकंपन्यांना नियमांचे पालन करावे लागेल, असे तुकाराम मुंढे यांनी ठणकावून सांगितले. दरम्यान, तुकाराम मुंढे यांच्या या निर्णयामुळे छोटे व्यावसायिक, व्यापारांना मोठा फटका बसत आहे, असा दावा केला जात होता. असे असतानाच आता राज्य सरकारने तुकाराम मुंढे यांनी घेतलेला निर्णय फिरवला आहे. सुटे खाद्यतेल विकण्यासाठी सरकारने एका वर्षाची मुदत दिली आहे. सुटे तेल विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यांच्या शिष्टमंडळाची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत बैठक झाली. या बैठकीत व्यापाऱ्यांनी त्यांच्या अडचणी फडणवीस यांना सांगितल्या.

# जेवणात पाल पडल्याने आश्रमशाळेतील ३१ विद्यार्थ्यांना विषबाधा

**नगराळा येथील अंबू नाईक आश्रमशाळेतील धक्कादायक प्रकार, राजुरा उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू**



**दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर (धनंजय पांढरे)**

जिल्ह्यातील जिवती तालुक्यातील नगराळा येथील अंबू नाईक माध्यमिक आश्रमशाळेत विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी गंभीर प्रकार घडल्याचे समोर आले आहे. आश्रमशाळेतील जेवणातून ३१ विद्यार्थ्यांना विषबाधा झाल्याची घटना घडली. जेवणानंतर विद्यार्थ्यांना मळमळ, उलटी, पोटदुखी आणि चक्कर येण्यास सुरुवात झाल्याने एकच खळबळ उडाली. बाधित सर्व विद्यार्थ्यांना तातडीने राजुरा येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, विद्यार्थ्यांसाठी जेवण तयार करत असताना त्यात पाल पडल्याचा प्रकार घडला. मात्र, याकडे दुर्लक्ष करून तेच अन्न शिजवून विद्यार्थ्यांना वाढण्यात आल्याचा आरोप केला जात आहे. जेवण केल्यानंतर काही वेळातच विद्यार्थ्यांना त्रास जाणवू लागला. विद्यार्थ्यांची प्रकृती बिघडत असल्याचे लक्षात येताच त्यांना तातडीने राजुरा येथील उपजिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले. या घटनेमुळे आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा आणि भोजनाच्या दजार्चा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या अन्नाच्या स्वच्छतेकडे व सुरक्षेकडे दुर्लक्ष झाल्याचा आरोप पालक व ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. या प्रकारामुळे पालकांमध्ये तीव्र संताप असून, विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या दोषी कर्मचाऱ्यांवर तसेच संस्थाचालकांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात येत आहे. दरम्यान, विषबाधेने बाधित झालेल्या सर्व ३१ विद्यार्थ्यांची प्रकृती सध्या स्थिर असल्याची माहिती प्रभारी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. भास्कर सोनारकर यांनी दिली. या गंभीर घटनेची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई होते का, याकडे पालक व ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

# रामटेकातील चौघानजवळ विटांनी भरलेला ट्रक झाडावर आदळला, ८ जण गंभीर

**अडीच तासांच्या अथक प्रयत्नानंतर तीन जेसीबीच्या मदतीने सर्व जखमींना काढले बाहेर**

**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

तालुक्यातील गट ग्रामपंचायत सोनेघाट अंतर्गत येणाऱ्या चौघान परिसरात विटांनी भरलेला ट्रक झाडावर आदळून भीषण अपघात झाला. या अपघातात ट्रकमध्ये बसलेले आठ जण गंभीर जखमी झाले असून, प्राथमिक उपचारानंतर सर्वांना पुढील उपचारासाठी नागपूर येथील मेडिकल रुग्णालयात हलविण्यात आले.



प्राप्त माहितीनुसार, चौघान येथील सोना ब्रिक्स येथून MH 40 CT 9476 क्रमांकाचा ट्रक विटा भरून मनसर अमराई येथे जात होता. ट्रकमध्ये चालक मतेंद्र राजकुमार नेवारे (३२) यांच्यासह दिशा मतेंद्र नेवारे (२३), हंसाबाई राजकुमार नेवारे (५५), हर्ष मतेंद्र नेवारे (२), सुरज क्रिष्णा पैकरा (१२), पृथ्वी क्रिष्णा पैकरा (१५), अभिजित क्रिष्णा पैकरा (१०) आणि मुकेश क्रिष्णा पैकरा (१८) हे प्रवास करीत होते. दरम्यान, चौघान वळणाजवळ चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने ट्रक थेट झाडावर जाऊन आदळला. ट्रकमध्ये मोठ्या प्रमाणात विटा भरलेल्या असल्याने अपघातानंतर केबिनमध्ये बसलेले सर्वजण अडकले.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी व उपविभागीय पोलीस अधिकारी रमेश बरकते, ठाणेदार राजेशकुमार थोरात व पोलीस कर्मचारी यांनी घटनास्थळी पोहोचून बचावकार्य सुरू केले. तब्बल अडीच तासांच्या अथक प्रयत्नांनंतर तीन जेसीबीच्या मदतीने सर्व आठही जखमींना ट्रकमधून बाहेर काढण्यात यश आले. यानंतर वाईल्ड चॅलेंजर ऑर्गनायझेशनच्या व इतर रुग्णवाहिकेतून सर्व जखमींना रामटेक उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे प्राथमिक उपचार केल्यानंतर पुढील उपचारासाठी सर्वांना मेडिकल रुग्णालय, नागपूर येथे हलविण्यात आले.

**बंद व्हेंटिलेटरचा मुद्दा ऐरणीवर**

दरम्यान, रामटेक उपजिल्हा रुग्णालयात व्हेंटिलेटर उपलब्ध नसल्याचे यावेळी निदर्शनास आले. तसेच १०८ रुग्णवाहिकेत व्हेंटिलेटर उपलब्ध असतानाही त्याच्या वापराबाबत प्रश्न उपस्थित झाला. या घटनेचे वृत्तांकन करताना पत्रकारांकडून बंद असलेल्या व्हेंटिलेटरचे फोटो व व्हिडिओ घेतले जात असताना उपस्थित डॉक्टर व कर्मचाऱ्यांनी आक्षेप घेतला. त्यामुळे रुग्णालयातील आपत्कालीन वैद्यकीय सुविधांबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, या संपूर्ण प्रकरणाची संबंधित प्रशासनाने चौकशी करण्याची मागणी होत आहे. घटनेची माहिती रामटेक पोलिसांना देण्यात आली असून, अपघाताचा पुढील तपास रामटेक पोलीस करीत आहेत.

# नागपूर जिल्ह्यातील ग्रामपंचायतींच्या सरपंच पदांचे सुधारित आरक्षण जाहीर




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर जिल्ह्यातील सन २०२५ ते २०३० या कालावधीत मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींसाठी सरपंच पदाचे तालुका निहाय आरक्षण निश्चित करण्यात आले आहे. ग्राम विकास विभाग, मुंबई यांच्या १२ ऑगस्ट २०२६ च्या शासन शुध्दीपत्रकानुसार हे आरक्षण निश्चित झाले असून, मुंबई ग्रामपंचायत (सरपंच उपसरपंच निवडणूक) नियम १९६४ मधील नियम ३ (अ) (ब) व (४) अन्वये मिळालेल्या अधिकारांचा वापर करून जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी ही अधिसूचना जारी केली आहे.

सन २०११ च्या जनगणनेच्या आधारे पुढील पाच वर्षांकरिता नागरिकांचा मागास प्रवर्ग व खुला प्रवगार्साठी तसेच या प्रवगार्तील महिलांसाठी सरपंच पदांची संख्या निश्चित करण्यात आली आहे. तालुका निहाय आरक्षण पुढीलप्रमाणे आहे.

काटोल तालुक्यात एकूण सरपंच पदे ८२ असून नागरिकांचा मागास प्रवर्ग १४, ना.मा.प्र. महिला ७, खुला प्रवर्ग ४१ आणि खुला महिला २१ पदे आहेत. नरखेड तालुक्यात एकूण सरपंच पदे ७० असून नागरिकांचा मागास प्रवर्ग १६, ना.मा.प्र. महिला ८, खुला प्रवर्ग ३५ आणि खुला महिला १८ पदे आहेत. सावनेर तालुक्यात एकूण सरपंच पदे ७५ असून नागरिकांचा मागास प्रवर्ग १३, ना.मा.प्र. महिला ७, खुला प्रवर्ग ३८ आणि खुला महिला १९ पदे आहेत. कळमेश्वर तालुक्यात एकूण सरपंच पदे ५० असून नागरिकांचा मागास प्रवर्ग १२, ना.मा.प्र. महिला ६, खुला प्रवर्ग २५ आणि खुला महिला १३ पदे आहेत. रामटेक तालुक्यात एकूण सरपंच पदे ४९ असून नागरिकांचा मागास प्रवर्ग ०, ना.मा.प्र. महिला ०, खुला प्रवर्ग २५ आणि खुला महिला १३ पदे आहेत. पारशिवनी तालुक्यात एकूण सरपंच पदे ४७ असून नागरिकांचा मागास प्रवर्ग १२, ना.मा.प्र. महिला ६, खुला प्रवर्ग २४ आणि खुला महिला १२ पदे आहेत. मौदा तालुक्यात एकूण सरपंच पदे ६३ असून नागरिकांचा मागास प्रवर्ग १७, ना.मा.प्र. महिला ९, खुला प्रवर्ग ३४ आणि खुला महिला १७ पदे आहेत. कामठी तालुक्यात एकूण सरपंच पदे ४५ असून नागरिकांचा मागास प्रवर्ग १२, ना.मा.प्र. महिला ६, खुला प्रवर्ग २४ आणि खुला महिला १२ पदे आहेत. उमरेड तालुक्यात एकूण सरपंच पदे ४७ असून नागरिकांचा मागास प्रवर्ग ६, ना.मा.प्र. महिला ३, खुला प्रवर्ग २४ आणि खुला महिला १२ पदे आहेत. भिवापूर तालुक्यात एकूण सरपंच पदे ५६ असून नागरिकांचा मागास प्रवर्ग ७, ना.मा.प्र. महिला ४, खुला प्रवर्ग २८ आणि खुला महिला १४ पदे आहेत. कुही तालुक्यात एकूण सरपंच पदे ५९ असून नागरिकांचा मागास प्रवर्ग १५, ना.मा.प्र. महिला ८, खुला प्रवर्ग ३० आणि खुला महिला १५ पदे आहेत. नागपूर ग्रामीण तालुक्यात एकूण सरपंच पदे ६२ असून नागरिकांचा मागास प्रवर्ग १२, ना.मा.प्र. महिला ६, खुला प्रवर्ग ३१ आणि खुला महिला १६ पदे आहेत. हिंगणा तालुक्यात एकूण सरपंच पदे ५१ असून नागरिकांचा मागास प्रवर्ग ९, ना.मा.प्र. महिला ५, खुला प्रवर्ग २६ आणि खुला महिला १३ पदे आहेत.

जिल्ह्यात एकूण सरपंच पदे ७५६ आहेत. त्यामध्ये नागरिकांचा मागास प्रवगार्साठी १४५ पदे, ना.मा.प्र. महिलांसाठी ७५ पदे, खुला प्रवगार्साठी ३८५ पदे आणि खुला महिलांसाठी १९५ पदे आरक्षित करण्यात आली आहेत.

# उड्डाण करताच इंजिन निकामी




**वृत्तसंस्था, पणजी**

गोव्याहून दिल्लीला जाणाऱ्या इंडिगोच्या विमानाचे उड्डाणानंतर लगेचच इंजिन निकामी झाले. यानंतर विमान पुन्हा माघारी वळवण्यात आले आणि गोवा विमानतळावर आपत्कालीन लँडिंग केले. विमान उतरल्यानंतर सर्व प्रवाशांना सुखरुप उतरवण्यात आले.

इंडिगोच्या ६ ई २१०२ या विमानाने मंगळवारी सकाळी ९.१६ वाजता गोव्याच्या मोपा विमानतळावरून दिल्लीसाठी उड्डाण घेतले. मात्र उड्डाणानंतर लगेचच १४,००० फूट उंचीवर असताना विमानाचे इंजिन निकामी झाले. यानंतर विमान माघारी गोवा विमानतळाकडे वळवण्यात आले. इंजिनमध्ये बिघाडाची माहिती मिळताच हवाई वाहतूक नियंत्रण कक्षाने सकाळी ९.३० वाजता मोपा विमानतळावर पूर्ण आणीबाणी जाहीर करण्यात आली. यानंतर विमानाने सकाळी ९.५० च्या सुमारास मोपा विमानतळावर सुरक्षित आपत्कालीन लँडिंग केले. इंडिगोने या घटनेबाबत एक निवेदन जारी करत घटनेला दुजोरा दिला आहे.

संपादकीय लेखणीतून...

# विश्व नारळ दिवस

जागतिक नारळ दिन दरवर्षी २ सप्टेंबरला साजरा केला जातो. नारळाच्या फळाचे आंतरराष्ट्रीय महत्त्व आणि विविध उपयोग लक्षात घेऊन या दिवसाचे आयोजन केले जाते. नारळ हा फळ म्हणून खाण्यासाठी तसेच त्याच्या तेलासाठी प्रसिद्ध आहे. नारळाचे दूध, खोबरेल तेल, नारळाचे पाणी आणि खोबरे या सर्वांचा वापर अन्न शिजवण्यासाठी, सौंदर्यप्रसाधने बनवण्यासाठी आणि औषधी गुणधर्मांसाठी केला जातो. जगभरातील उष्णकटिबंधीय प्रदेशांमध्ये नारळ उत्पादन होतो, ज्यामुळे शेतकऱ्यांना रोजगार आणि आर्थिक स्थिरता मिळते. विशेषतः भारत, फिलिपिन्स, इंडोनेशिया, आणि श्रीलंका हे नारळ उत्पादन करणारे प्रमुख देश आहेत. नारळाच्या उत्पादनामुळे या देशांच्या अर्थव्यवस्थेत महत्त्वाची भर पडते. भारतीय संस्कृतीत आणि दैनंदिन जीवनशैलीत नारळाला 'कल्पवृक्ष' म्हणून विशेष स्थान आहे.

नारळाचे झाड आणि माहितीः नारळाच्या झाडाला 'माड' म्हणतात. हा विषुववृत्तीय व उष्णकटिबंधीय प्रदेशांत, प्रामुख्याने समुद्रकिनाऱ्यालगत वाढणारा ताड कुळातील एक वृक्ष आहे. उंचीः सुमारे ३० मीटर. पानेः ४ ते ६ मीटर लांबीची झावळ्यांच्या स्वरूपात. उत्पादनः माडाला वर्षातल्या प्रत्येक महिन्यात फुलांचा तुरा लागतो. एका झाडापासून वर्षाला सरासरी ५० ते १०० नारळ मिळतात. नारळाचे आरोग्यदायी फायदेः १) नारळ पाणीः हे नैसर्गिक हायड्रेशनचा उत्तम स्त्रोत आहे. यात भरपूर पोटॅशियम असते, जे रक्तदाब नियंत्रित ठेवण्यास मदत करते. २) कच्चे खोबरेः कच्चे खोबरे खाल्ल्याने शरीराला तांबे, लोह, पोटॅशियम आणि मॅग्नेशियमसारखी आवश्यक खनिजे मिळतात आणि शरीराला झटपट ऊर्जा मिळते. ३) त्वचा व केसः नारळ पाणी आणि खोबरेल तेल त्वचेचे व केसांचे आरोग्य सुधारण्यासाठी उपयुक्त ठरतात. ४) विविध उपयोगः नारळाचे फळ भूक भागवण्यासाठी आणि पाणी तहान शमवण्यासाठी वापरले जाते. नारळाच्या केस- काथ्यांपासून दोरी, चटया, ब्रश व पिशव्या बनवल्या जातात. नारळाच्या लाकडाचा वापर फर्निचरसाठी व बाहेरील आवरणाचा वापर भांडी किंवा इंधन म्हणून होतो.

माड किंवा श्रीफळः हा विषुववृत्तीय व उष्णकटिंबंधीय प्रदेशांत मुख्यत्वे समुद्रकिनारे आणि लगतच्या भागात वाढणारा, ताड कुळातील एक वृक्ष आहे. याचे फळ नारळ या नावाने ओळखले जाते. सुमारे ३० मीटर उंचीच्या या वृक्षाला ४-६ मीटर लांबीची झावळ्यांच्या स्वरूपातील पाने फुटतात. माडाला, वर्षातल्या दर महिन्यात फुलांचा एक तुरा लागतो. तुऱ्यातील मादी फुलांना लागलेली फळे अकरा ते बारा महिन्यांत पक्व होतात, म्हणजेच प्रत्येक महिन्यात प्रत्येक झाडावरून एक घड काढायला मिळतो. या झाडाच्या प्रत्येक अवयवाचा काहीना काही उपयोग आहे, म्हणून या झाडाला कोकणात कल्पवृक्ष मानतात. नारळ फुलणे-वाळलेल्या ओल्या नारळाला शहाळे असे म्हणतात. याचे पाणी शक्तिवर्धक, थंड व खनिजसंपन्न असते. आजारी, अपचन, जुलाब झालेल्या व्यक्तींना विशेष उपयोगी समजले जाते. शहाळ्यातून निघणाऱ्या पक्व नारळाला शुभ प्रसंगी श्रीफळ म्हणतात.

सांस्कृतिक महत्त्व - नारळाचे झाड : हिंदूंसह आशियातील अनेक श्रद्धावान नारळ हे फळ पवित्र मानतात. त्याला धार्मिक कार्यात वापरताना श्रीफळ म्हणतात. नारळचा वापर सगळ्यात जास्त मंदिरांमध्ये केला जातो. दिवाळी, दसरा, गणपती पूजा या दिवशी देवाला मोठ्या प्रमाणात नारळ अर्पण केले जातात. या झाडाला इच्छापूर्तीचे झाड असेही म्हटले जाते, कारण या झाडाच्या सगळ्या अंगाचा उपयोग करता येतो. शहाळे व श्रीफळः दिवाळी आणि कोजागरी पौर्णिमामध्ये लक्ष्मी पुजामध्ये बंगाली समाजातील लोक लोख्खी पूजामध्ये शहाळी वा ताजे नारळ वापरतात. तांबे कलश किंवा मातिचा कुंभावर आणि शहाळीनारळावर सिंदूराने बंगाली हिंदू स्वस्तिक चिन्ह जे मध्यमा बोटाने आणि लाल सिंदूर लेपाचा वापर करून काढतात. या दिवशी भक्तीने शंख सहित लक्ष्मीनारायणाची पूजा करतात. माडी : माडाच्या फळांच्या पेंडीच्या बुंध्याला एक भोक पाडले जाते. त्यातून स्त्रवणारा पांढरा रस म्हणजे 'माडी'. हा स्त्रवणारा पांढरा रस मडक्याच्या तोंडाला फडके बांधून त्याला नळी आत जाऊ शकेल एवढे भोक पाडून त्यात नळीद्वारे हा रस साठवतात. सुरुवातीला माडी थंडगार आणि अतिशय मधुर असते, पण तीच माडी काही काळ सेवन न करता राहिली तर तिच्यात मद्यार्क निर्मितीची प्रक्रिया सुरू होते. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी माडी मिळते.

नारळाचे फायदे - १) निर्मळ व नितळ त्वचाः पावसाळ्याच्या दिवसात चेहरा चिकचिकीत ऑईली होणे ही खूप मोठी समस्या तरुणींसमोर उभी राहते, त्यावर उपाय म्हणजे नारळाचे पाणी. ते आपण चेह-याला लावून ठेवले तर त्यामुळे त्वचा निर्मळ आणि नितळ राखण्यासाठीही मदत होईल. ओल्या नारळाच्या गरामध्ये प्रथिने, तेल आणि इतर काही ऑग्रेनिक तत्त्व असतात, त्यामुळे त्वचेला त्याचा फायदा होतो.

# अग्नितांडवात माणुसकी: जिवाची बाजी लावून निष्पापांना वाचवणाऱ्या 'देवदूत' परिचारिका

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

अमरावतीच्या जिल्हा स्त्री रुग्णालयातील नवजात शिशूंच्या अतिदक्षता विभागात घडलेली ती रात्र संपूर्ण महाराष्ट्राचे काळीज पिळवटून टाकणारी ठरली. इतर दिवसांप्रमाणेच शांत वाटणाऱ्या त्या वॉर्डात व्हेंटिलेटरवर ठेवलेली चिमुकली जीव वाचवण्यासाठी श्वास घेत होती. मात्र, अचानक झालेल्या एका प्रचंड स्फोटाने संपूर्ण इमारत हादरून गेली आणि क्षणात तिथले वातावरण भयपटासारखे बदलले. व्हेंटिलेटरला लागलेली आग वाऱ्यासारखी पसरली आणि संपूर्ण वॉर्डात विषारी, काळ्याकुट्ट धुराचे साम्राज्य निर्माण झाले. विजेचा संपर्क तुटल्यामुळे अंधार आणि त्यात आगीच्या भडकणाऱ्या ज्वाळा अशा अत्यंत भीषण परिस्थितीत, नवजात बालकांचा जीव अक्षरशः टांगणीला लागला होता. अशा जीवन-मरणाच्या अत्यंत बिकट क्षणी कर्तव्यावर हजर असणाऱ्या सुरेखा धनविजय आणि कीर्ती गणवीर या परिचारिकांच्या रूपाने प्रत्यक्ष माणुसकी आणि मातृत्वाचा साक्षात्कार घडला. स्फोटाच्या आवाजाने कोणीही सामान्य व्यक्ती जिवाच्या भीतीने बाहेर पळाली असती; पण या दोघींनी उलटी दिशा पकडली. धुरामुळे डोळे चुरचुरत होते, श्वास घेणे अशक्य होत होते आणि समोर आगीच्या प्रचंड झळा येत होत्या. मात्र, त्या अंधारात त्यांना केवळ त्या चिमुकल्यांचा जीव वाचवणे हेच एकमेव ध्येय दिसत होते. "आम्ही आमचा विचारच केला नाही, समोर फक्त ती निरागस लेकरं दिसत होती," हा त्यांनी नंतर सांगितलेला थरार त्या क्षणाची दाहकता स्पष्ट करतो.



परिस्थिती अत्यंत नाजूक होती, कारण बालके ही अतिदक्षता विभागात व्हेंटिलेटर आणि विविध वैद्यकीय नळ्यांच्या (इंट्युबेशन) साहाय्याने उपचार घेत होती. जराशीही घाई किंवा चुकीचा हात लागला तरी बालकांचा जीव जाण्याचा धोका होता. अशा प्रचंड ताणतणावाच्या क्षणीही या परिचारिकांनी अतुलनीय प्रसंगावधान दाखवले. एका हाताने आग थोपवण्याचा प्रयत्न करत, त्यांनी अत्यंत कौशल्याने आणि वेगाने बालकांच्या शरीरावरील नळ्या वेगळ्या केल्या आणि एकापाठोपाठ एका बाळाला आपल्या कुशीत घेऊन सुरक्षित बाहेर काढण्यास सुरुवात केली.

या अथक बचावकार्यादरम्यान आगीच्या तीव्र झळांमुळे आणि गरम उपकरणांच्या संपर्कामुळे सुरेखा आणि कीर्ती या दोघींचे हात भाजून निघाले. कातडी जळत होती, असह्य वेदना होत होत्या; पण निष्पाप जिवांना वाचवण्याच्या जिद्दीपुढे त्यांनी स्वतःच्या जखमांकडे साफ दुर्लक्ष केले. त्यांच्या या अभूतपूर्व धाडसामुळे नऊपैकी तब्बल सहा नवजात बालकांना सुरक्षित बाहेर काढून तातडीने पुढील उपचारांसाठी सुपर स्पेशालिटी रुग्णालयात दाखल करणे शक्य झाले. जर या दोघींनी हा धोका पत्करला नसता, तर आगीचे तांडव संपूर्ण वॉर्ड गिळंकृत करून गेले असते.

या दुर्घटनेत तीन निष्पाप बालकांचा दुर्दैवी अंत झाला, ज्याची भरून न येणारी खंत या परिचारिकांच्या डोळ्यांत सतत अश्रूंच्या रूपाने पाहायला मिळते. स्वतःच्या जिवाची पर्वा न करता, हाताला गंभीर जखमा झालेल्या असतानाही सहा चिमुकल्यांना पुनर्जन्म देणाऱ्या या 'देवदूत' परिचारिकांची कर्तव्यनिष्ठा केवळ अमरावतीसाठीच नव्हे, तर संपूर्ण मानवजातीसाठी एक आदर्श आणि सर्वोच्च त्यागाचे प्रतीक बनली आहे. धगधगत्या आगीच्या ज्वाळा, काळ्याकुट्ट धुराचे लोट आणि एका क्षणात मृत्यूच्या दाढेत ओढल्या गेलेल्या त्या नवजात बालकांच्या आक्रोशासमोर उभ्या राहिलेल्या या परिचारिकांनी दाखवलेले असीम धैर्य हे केवळ वैद्यकीय सेवेपुरते मर्यादित नसून, ते प्रत्यक्ष माणुसकीच्या आणि सर्वोच्च मातृत्वाच्या परमोच्च पातळीचे दर्शन घडवणारे आहे.

स्वतःचे हात भाजून असह्य वेदना होत असताना, शरीराची होणारी लाहीलाही विसरून केवळ निष्पाप जिवांना मृत्यूच्या विळख्यातून बाहेर ओढून आणण्यासाठी त्यांनी जीवाची बाजी लावली. संकटाच्या क्षणी स्वतःच्या सुरक्षिततेचा लवलेशही विचार न करता, दुसऱ्याच्या नवजात लेकरांना पुनर्जन्म देण्याचे हे अचाट धाडस केवळ कर्तव्य म्हणून केले जाऊ शकत नाही; तर त्यामागे मानवी मूल्यांचा, निस्वार्थ प्रेमाचा आणि अलौकिक त्यागाचा महामेरू उभा आहे. आगीच्या त्या भीषण तांडवात या दोघींनी दाखवलेले अतुलनीय प्रसंगावधान आणि शौर्य हे केवळ अमरावतीच्या जिल्हा रुग्णालयापुरते किंवा त्या एका शहरापुरते मर्यादित न राहता, संकटाच्या काळात कर्तव्य कसे निभवावे याचा एक दीपस्तंभ बनले आहे. जगातील कोणत्याही मोठ्या पुरस्कारापेक्षा किंवा प्रशंसेपेक्षा या परिचारिकांनी निष्पाप बालकांसाठी दिलेला हा लढा अधिक श्रेष्ठ असून, स्वतःच्या जखमांना माणुसकीच्या सेवेचा अलंकार मानणाऱ्या या 'देवदूतांची' ही अभूतपूर्व कर्तव्यनिष्ठा संपूर्ण मानवजातीला अनंत काळासाठी प्रेरणा देत राहील.

- ९५६१५९४३०६

# भारतीय खेळाडूंच्या अफलातून कामगिरीचा तडका

डॉ.दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

भारतीय क्रिकेटच्या खेळपट्टीवर नेहमीच फलंदाजांचे गोडवे गायले गेले; पण सामन्याचे पारडे फिरवून विजयाची खरी पटकथा लिहिली ती आपल्या धारदार गोलंदाजांनीच! एकदिवसीय क्रिकेटच्या रणांगणावर भारतासाठी सर्वाधिक बळी टिपणाऱ्या गोलंदाजांवर नजर टाकली, तर आजही 'जम्बो' अर्थात अनिल कुंबळे यांच्या नावाचा दरारा कायम आहे. तब्बल ३३७ विकेट्सचा डोंगर रचून कुंबळे अव्वल स्थानी ठाण मांडून बसले आहेत.

**३०० चा एलिट क्लब आणि दिग्गजांचे वर्चस्व**

भारताकडून ३०० हून अधिक एकदिवसीय विकेट्स घेण्याचा पराक्रम केवळ दोघांनाच साधता आला आहे. यात कुंबळे यांच्यापाठोपाठ 'म्हैसूर एक्सप्रेस' जवागल श्रीनाथ ३१५ विकेट्ससह दुसऱ्या स्थानावर आहेत. अजित आगरकरने आपल्या झंझावाती इनस्विंगर्सच्या जोरावर २८८ विकेट्स घेत तिसरे स्थान पटकावले आहे. भारताच्या २००३ व २०११ च्या विश्वचषक मोहिमेचा नायक झहीर खान २८२ विकेट्ससह चौथ्या स्थानी आहे. 'टर्बनेटर' हरभजन सिंगच्या फिरकीने २६९ फलंदाजांना तंबूचा रस्ता दाखवत पाचवे स्थान मिळवले.

भारताला १९८३ चा ऐतिहासिक विश्वचषक जिंकून देणारे 'हरयाणा हरिकेन' कपिल देव २५३ विकेट्ससह सहाव्या स्थानावर दिमाखात उभे आहेत.

**सध्याच्या शिलेदारांची तुफानी आगेकूच**

जुने दिग्गज निवृत्त झाले तरी सध्याच्या गोलंदाजांनी प्रतिस्पर्धी फलंदाजांची झोप उडवणे सुरूच ठेवले आहे. 'सर' रवींद्र जडेजा आपल्या अचूक माऱ्याने २३२ विकेट्स घेत सातव्या स्थानावर विराजमान आहे. मोहम्मद शमीच्या रिव्हर्स स्विंग आणि सीम पोझिशनने २०६ फलंदाजांचा त्रिफळा उडवून त्याला आठवे स्थान मिळवून दिले. माजी वेगवान गोलंदाज व्यंकटेश प्रसाद १९६ विकेट्ससह नवव्या, तर 'चायनामन' जादूगार कुलदीप यादव १९४ विकेट्ससह थेट दोनशेच्या उंबरठ्यावर उभा आहे.

**सचिनचा अनोखा जलवा अन् 'बूम-बूम' बुमराहची एन्ट्री!**

स्विंगचा जादूगार इरफान पठाण (१७३ विकेट्स), आशिष नेहरा (१५७ विकेट्स), मनोज प्रभाकर (१५७ विकेट्स) आणि फिरकीचा चाणक्य रविचंद्रन अश्विन (१५६ विकेट्स) यांनीही या विक्रमी ताफ्यात आपले नाव कोरले आहे. आश्चर्याची आणि अभिमानाची गोष्ट म्हणजे, शतकांचा बादशाह सचिन तेंडुलकरने गोलंदाजीतही कमाल दाखवत तब्बल १५४ विकेट्स आपल्या खात्यात जमा केल्या आहेत! या विक्रमी यादीत अखेरचा पण सर्वात घातक वार ठरतोय तो जसप्रीत बुमराह! आपल्या अनोख्या अँक्शन आणि भेदक यॉर्कर्सच्या बळावर बुमराहने १५० विकेट्सचा टप्पा ओलांडून 'सुपर १६' च्या विक्रमी क्लबमध्ये अधिकृत प्रवेश केला आहे.

**पहिल्याच कसोटीत गाजवला मैदानाचा फड! कसोटी पदार्पणातच 'सामनावीर' ठरणारे भारतीय शिलेदार**

कसोटी क्रिकेट हे क्रिकेटमधील सर्वोच्च आणि सर्वात खडतर प्रारूप मानले जाते. आंतरराष्ट्रीय स्तरावर आपल्या देशाचे प्रतिनिधित्व करताना पहिल्याच सामन्यात खेळण्याचा दबाव प्रत्येक खेळाडूवर असतो. मात्र, भारतीय क्रिकेटच्या इतिहासात असे काही प्रतिभावान खेळाडू झाले आहेत, ज्यांनी या दबावावर मात करत कसोटी पदार्पणातच आपल्या उत्कृष्ट कामगिरीने सामना फिरवला आणि पदार्पणाच्याच सामन्यात प्लेअर ऑफ द मॅच (सामनावीर) हा बहुमान पटकावला.

प्रवीण आमरे यांच्या ऐतिहासिक शतकापासून ते युवा फिरकीपटू मानव सुथारच्या दमदार कामगिरीपर्यंत, कसोटी पदार्पणातच सामनावीर ठरलेल्या या भारतीय खेळाडूंवर टाकलेली ही एक विशेष नजरः

**१. प्रवीण आमरे (१९९२) - डर्बनमध्ये रचला इतिहास**

दक्षिण आफ्रिकेविरुद्ध १९९२ मध्ये डर्बनच्या उसळत्या खेळपट्टीवर प्रवीण आमरे यांनी कसोटी पदार्पण केले होते. भारतीय संघ अडचणीत असताना आमरे यांनी संयमी व झुंजार ११३ धावांची शतकी खेळी साकारली आणि पदार्पणातच सामनावीर ठरण्याचा पराक्रम केला.

**२. आर. पी. सिंग (२००६) - फैसलाबादमध्ये पाकिस्तानला घाम फोडला**

२००६ मध्ये पाकिस्तान दौऱ्यावरील फैसलाबाद कसोटीत डाव्या हाताचा वेगवान गोलंदाज आर. पी. सिंग याने कसोटी पदार्पण केले. सपाट खेळपट्टीवरही त्याने भेदक मारा करत सामन्यात ५ महत्त्वपूर्ण बळी टिपले आणि पदार्पणातच सामनावीर पुरस्कार पटकावला.

**३. रविचंद्रन अश्विन (२०११) - फिरकीच्या जोरावर वेस्ट इंडिज उद्ध्वस्त**

२०११ मध्ये दिल्ली येथे वेस्ट इंडिजविरुद्ध रविचंद्रन अश्विनने कसोटी पदार्पण केले. त्याने आपल्या जादुई फिरकीच्या जोरावर दोन्ही डावांत मिळून तब्बल ९ बळी घेतले. हा त्याच्या जागतिक दर्जाच्या फिरकी कारकिर्दीचा धडाकेबाज प्रारंभ ठरला.

**४. शिखर धवन (२०१३) झ ऑस्ट्रेलियाविरुद्ध वादळी १८७ धावा**

२०१३ च्या मोहाली कसोटीत शिखर धवनने पदार्पण करताना ऑस्ट्रेलियन गोलंदाजांची अक्षरशः धुलाई केली. त्याने अवघ्या ८५ चेंडूंत पदार्पणातील सर्वात जलद शतक ठोकण्याचा विक्रम केला आणि एकूण १८७ धावांची ऐतिहासिक खेळी करत सामनावीर पुरस्कार पटकावला.

**५. रोहित शर्मा (२०१३) - कोलकाताच्या ईडन गार्डन्सवर गाजवले पदार्पण**

२०१३ मध्ये सचिन तेंडुलकरच्या निवृत्ती मालिकेदरम्यान कोलकाता येथे रोहित शर्माने वेस्ट इंडिजविरुद्ध पदार्पण केले. मधल्या फळीत फलंदाजीला येत रोहितने १७७ धावांची क्लासिक खेळी उभारली आणि भारताच्या विजयात मोलाचा वाटा उचलून सामनावीराचा किताब जिंकला.

**६. पृथ्वी शॉ (२०१८) - युवा वयात शतकी धमाका**

२०१८ मध्ये राजकोट येथे वेस्ट इंडिजविरुद्ध युवा सलामीवीर पृथ्वी शॉने पदार्पण केले. पदार्पणाच्या कसोटीत अवघ्या ९९ चेंडूंत शतक ठोकत त्याने १३४ धावांची धडाकेबाज खेळी केली आणि पदार्पणातच सामनावीर होणारा सर्वात तरुण भारतीय फलंदाज ठरला.

**७. श्रेयस अय्यर (२०२१) - दोन्ही डावांत चमकणारा मुंबईकर**

२०२१ मध्ये कानपूर येथे न्यूझीलंडविरुद्ध श्रेयस अय्यरने पदार्पण केले. त्याने पहिल्या डावात १०५ धावांचे दिमाखदार शतक आणि दुसऱ्या डावात ६५ धावांची उपयुक्त अर्धशतकी खेळी करत सामनावीराचा पुरस्कार आपल्या नावे केला.

**८. यशस्वी जायसवाल (२०२३) - वेस्ट इंडिजमध्ये गाजवला डंका**

२०२३ मध्ये वेस्ट इंडिजविरुद्ध डॉमिनिका येथे यशस्वी जायसवालने कसोटी पदार्पण केले. सलामीला येत त्याने अत्यंत संयमी आणि आक्रमक अशा १७१ धावांची मॅरेथॉन खेळी केली आणि पहिल्याच सामन्यात सामनावीर ठरण्याचा मान मिळवला.

**९. मानव सुथार (२०२६) - अफगाणिस्तानविरुद्ध फिरकीची जादू**

युवा फिरकीपटू मानव सुथारने अफगाणिस्तानविरुद्ध कसोटी पदार्पण करताना आपल्या अचूक फिरकीच्या जोरावर ७ बळी मिळवून भारतीय संघाच्या विजयात निर्णायक भूमिका बजावली आणि या एलिट यादीत आपले स्थान पक्के केले.

**निष्कर्ष** : कसोटी क्रिकेटमध्ये पदार्पण करणे हे कोणत्याही खेळाडूचे स्वप्न असते; मात्र पहिल्याच कसोटीत संघाच्या विजयाचा शिल्पकार ठरून सामनावीर होणे ही अद्वितीय कामगिरी असते. या सर्व खेळाडूंनी भारतीय क्रिकेटचा वारसा अभिमानाने पुढे नेला आहे.

- ९०९६३७२०८२

# प्रामाणिक विद्यार्थ्यांचं भविष्य एमपीएससीच्या अंतर्गत व्यवस्थेचा बळी ठरतोय

सुनील शिरपुरे
यवतमाळ

महाराष्ट्रातील सर्वात मोठी आणि काठिण्य पातळी असलेली स्पर्धा परीक्षा महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी) ची राज्यसेवा परीक्षा ही मानली जाते. याच एमपीएससीच्या कारभारावर आणि निष्पक्षतेवर वारंवार नवनवीन प्रश्नचिन्हे उपस्थित होत आहेत. आयोगाच्या भोंगळ व्यवस्थापनामुळे लाखो प्रामाणिक विद्यार्थ्यांचे भविष्य अधांतरी आहे. एमपीएससी राज्यसेवा मुख्य परीक्षेचा 'कटऑफ' अर्थात किमान गुण केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (यूपीएससी) तुलनेत तब्बल २०० गुणांहून अधिक लागल्यामुळे सध्या मोठा वाद निर्माण झाला आहे. ऑगस्ट २०२६ च्या अखेरीस महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने राज्यसेवा मुख्य परीक्षेचा निकाल जाहीर केला, ज्यामध्ये खुल्या प्रवर्गातील महिलांचा कटऑफ चक्क ९५९ गुण आणि सामान्य खुल्या प्रवर्गाचा कटऑफ ९४२ गुण लागला आहे. दोन्ही संस्थांचा मुख्य परीक्षेचा अभ्यासक्रम आणि एकूण गुण (१,७५० गुण) सारखेच असताना, एमपीएससीचा कटऑफ अनैसर्गिकरीत्या वाढल्याने उत्तरपत्रिका तपासणीच्या पारदर्शकतेवर विद्यार्थ्यांनी तीव्र आक्षेप घेतला आहे.

एकाच अभ्यासक्रमावर आधारित परीक्षेत एमपीएससीचा 'खुला अराखीव' कटऑफ यूपीएससीपेक्षा २०३ गुणांनी, तर 'महिला' कटऑफ २२० गुणांनी जास्त लागला आहे. वर्णनात्मक (डिस्क्रिप्टिव्ह) पॅटर्नमध्ये एवढे जास्त गुण मिळणे अशक्यप्राय मानले जाते. हस्तलिखित उत्तरपत्रिका तपासताना गोपनीयतेचा भंग करून 'सेटिंग' केलेल्या उमेदवारांना हवे तसे गुण उधळले गेले असावेत, असा संशय विद्यार्थ्यांनी व्यक्त केला आहे. नुकतेच अन्न व औषध प्रशासनातील 'ड्रग इन्स्पेक्टर' परीक्षेची प्रश्नपत्रिका थेट एमपीएससीच्या अवर सचिवासह कर्मचा-यांनीच विकल्याचे उघडकीस आले होते. त्यामुळे मुख्य परीक्षेच्या मूल्यमापन साखळीतही मोठा गैरव्यवहार झाल्याची शक्यता वर्तवली जात आहे.

राज्यसेवा मुख्य परीक्षेच्या अचाट आणि अशक्यप्राय कटऑफ ने संपूर्ण उत्तरपत्रिका तपासणी प्रक्रियेतील पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह आ वासून उभे आहेत. त्यामुळे आता राज्यसेवा परीक्षेचा निकाल जाहीर होताच पुन्हा एकदा विविध प्रश्न उपस्थित झालेले आहेत. यूपीएससीपेक्षा २०० गुणांनी जास्त कटऑफ कसा? असा संभ्रम काही विद्यार्थ्यांमध्ये उपस्थित झाला आहे. केंद्रीय लोकसेवा आयोग (यूपीएससी) आणि एमपीएससीचा मुख्य परीक्षेचा अभ्यासक्रम एकच असताना, दोन्ही संस्थांच्या मुख्य परीक्षेच्या कटऑफ मधील तफावत थक्क करणारी आहे. हा राज्यात नोंदवला गेलेला सर्वोच्च कटऑफ आहे. एकाच अभ्यासक्रमावर आधारित परीक्षेत एमपीएससीचा कटऑफ जास्त कसा जाऊ शकतो? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

यूपीएससी आणि एमपीएससीचा अभ्यासक्रम एकच मग कटऑफमध्ये २२० गुणांचा फरक कसा? अन्न व औषध प्रशासन निरीक्षक पेपरफुटीनंतर आता राज्यसेवेच्या उत्तरपत्रिका मूल्यांकनावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत. त्यामुळे बहुपर्यायी प्रश्नपत्रिका हाच उपाय असल्याचे उमेदवारांचे मत आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने परीक्षेमध्ये वर्णनात्मक (डिस्क्रिप्टिव्ह) परीक्षा लागू केली आहे. याला काही विद्यार्थ्यांचा विरोध असला तरी अनेक विद्यार्थी वर्णनात्मक परीक्षेच्या बाजूने आहेत. वर्णनात्मक परीक्षामुळे ख-या आणि अभ्यासू विद्यार्थ्यांना न्याय मिळतो असेही अनेक विद्यार्थी मानतात. त्यामुळे काही विद्यार्थी बहुपयार्यी परीक्षेची मागणी करत असले तरी अनेकांचा पाठिंबा हा वर्णनात्मक परीक्षेलाही आहे. परंतु वर्णनात्मक परीक्षा पद्धतीतील धोके समोर येताना दिसत आहेत.

ड्रग इन्स्पेक्टर प्रकरणात आयोगाचे स्वतःचेच अधिकारी सहभागी असल्याचे सिद्ध झाल्याने वर्णनात्मक परीक्षा पद्धतीतील भयानक धोके समोर आले आहेत, ज्यामुळे वर्णनात्मक पॅटर्न म्हणजे गैरव्यवहाराची साखळी असल्याचे स्पष्ट होते.

या पॅटर्नमुळे पेपर फुटी व फेरफाराचा धोका वाढलेला आहेत. हस्तलिखित उत्तरपत्रिका, कस्टडी आणि तपासणीच्या साखळीत अधिकारी भ्रष्ट असतील, तर उत्तरपत्रिका बदलणे, विशिष्ट उमेदवारांना गुण उधळून देणे आणि गोपनीयतेचा भंग करणे वर्णनात्मक पॅटर्नमध्ये अत्यंत सुलभ असते. ओळखीच्या किंवा सेटिंग केलेल्या उमेदवारांना डिस्क्रिप्टिव्हमध्ये हवे तसे गुण देऊन कटऑफ अनैसर्गिकरीत्या ९५० च्या पार नेला जाऊ शकतो. ज्यामुळे मूल्यांकनातील असमानता व पक्षपात स्पष्ट दिसून येते.

आयोगातील भ्रष्ट अधिकाऱ्यांची साखळी आणि संशयास्पद मूल्यमापन पद्धत उध्वस्त करायची असेल, तर राज्यसेवा मुख्य परीक्षा शंभर टक्के पूर्ववत वस्तुनिष्ठ (ऑब्जेक्टिव्ह-मल्टीपल चॉइस क्वेश्चन अर्थात बहुपर्यायी प्रश्न) करणे हाच एकमेव मार्ग उरतो. ऑप्टिकल मार्क रिकग्निशन (ओएमआर) उत्तरपत्रिका संगणकाद्वारे तपासल्या जात असल्याने कोणत्याही अधिकारी किंवा कर्मचाऱ्याला गुणांमध्ये फेरफार करता येत नाही. योग्य उत्तराला गुण आणि चुकीच्या उत्तराला नकारात्मक गुण मिळतात, ज्यामुळे 'अशक्य' आणि संशयास्पद कटऑफ लागण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

आयोगाच्या स्वतःच्या अवर सचिवांपासून ते कर्मचाऱ्यांपर्यंतची टोळीच पेपरफुटीत गळ्यापर्यंत उतरलेली असताना आणि मूल्यांकनात २००-२०० गुणांची उघडीबोगडी उधळपट्टी होत असताना, एमपीएससीची विश्वासार्हताही धुळीस मिळाली आहे. अशा संशयास्पद वातावरणात वर्णनात्मक पॅटर्न लादणे म्हणजे प्रामाणिक विद्यार्थ्यांच्या भविष्याचा बळी देऊन भ्रष्टाचाराचे नवीन रस्ते मोकळे करून देणेच ठरेल. हा भोंगळ कारभार रोखण्यासाठी आणि गुणवतेचा अधिकार टिकवण्यासाठी एमपीएससीने सर्व हट्ट बाजूला सारून आगामी राज्यसेवा मुख्य परीक्षेसाठी वस्तुनिष्ठ पॅटर्नच पूर्ववत लागू करावा, अन्यथा राज्यभरातील विद्यार्थी रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाहीत आणि उतरायलाच पाहिजे.

- ७४९८८८५०६१

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

थोडक्यात

## पी.एम.श्री. उच्च प्राथमिक जि.प. शाळा चाचेरच्या शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी जीवन यशवंत सहारे यांची फेरनिवड

**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

आज मंगळवार (ता. १ सप्टेंबर) ला पी.एम.श्री. उच्च प्राथमिक जिल्हा परिषद शाळा चाचेर येथे शाळा व्यवस्थापन समितीची महत्वाची सभा मोठ्या उत्साहात पार पडली. या सभेत सर्व पालक व



सदस्यांनी एकमताने जीवन यशवंत सहारे यांची शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी फेरनिवड केली. तसेच उपाध्यक्ष व इतर सर्व सदस्यांची देखील एकमताने निवड करण्यात आली. जीवन सहारे यांच्या मागील कार्यकाळामध्ये शाळेच्या पटसंख्येमध्ये लक्षणीय वाढ झाली असून, शाळेच्या सर्वांगीण विकासात्मक कामांमध्ये त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे. शाळेची भौतिक सुविधा, शैक्षणिक गुणवत्ता आणि विद्यार्थ्यांच्या हितासाठी अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम त्यांच्या काळात राबविण्यात आले. त्यांच्या याच कायार्ची दखल घेऊन व त्यांच्या कार्यपद्धतीवर विश्वास ठेवून सर्व पालक वर्गाने दुसऱ्यांदा त्यांच्यावर अध्यक्षपदाची जबाबदारी सोपवली आहे. उपाध्यक्ष शुभांगी प्रकाश आंबीलढूके,रामकृष्ण आंबीलढूके,सुनील राऊत,प्रफुल बादोले, नितीन चौधरी, सुनीता वानखेडे,कीर्ती अढाऊ, सीमा चौरे ,अरभूनी ठोसरे, गुलाब पडोळे, किरण बरबटे यांची सदस्य म्हणून निवड करण्यात आली.

निवडीनंतर बोलताना जीवन सहारे यांनी सर्वांचे आभार मानले व यापुढेही शाळेच्या विकासासाठी व पटसंख्या वाढीसाठी कटिबद्ध राहणार असल्याचे सांगितले. याप्रसंगी गावच्या प्रथम नागरिक सरपंच लुंबिनी महेश कलारे, गावचे पोलीस पाटील ज्ञानेश्वर नाकाडे, तंटामुक्ती समिती अध्यक्ष प्रकाशजी काळे, शाळेचे मुख्याध्यापक अनिल गडपायले, शिक्षकवृंद रवींद्र घुगे, भारती साखरकर,कु. परवीन शेख, प्रीती खंगार, शिल्पा उकुड्डे,नेहा निमजे, रुचिला खंडाईत,संगीता बालकोटे,शिक्षक वृंद, पालक वर्ग व इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.या निवडीमुळे चाचेर गावात,पालक वर्गामध्ये व शाळेमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, सर्व स्तरातून जीवन सहारे यांचे अभिनंदन होत आहे.

## सायंटिफिक शाळेच्या विद्यार्थिनींनी नगरपंचायत अधिकारी-कर्मचाऱ्यांना बांधली राखी



**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

रक्षाबंधनाचा सण केवळ भाऊ-बहिणीपुरता मर्यादित न ठेवता सामाजिक बांधिलकीची जाणीव जागविण्याचा संदेश येथील सायंटिफिक शाळेच्या विद्यार्थिनींनी दिला. नगरपंचायत कार्यालयात जाऊन त्यांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांना रक्षासूत्र बांधत रक्षाबंधन साजरे केले. 'रक्षण' म्हणजे केवळ व्यक्तीचे नव्हे, तर शहर, समाज आणि संस्कृतीच्या सुरक्षिततेची जबाबदारीही प्रत्येकाची आहे, हा सामाजिक विचार या उपक्रमातून अधोरेखित करण्यात आला. विद्यार्थिनींच्या या आगळ्यावेगळ्या उपक्रमामुळे नगरपंचायत परिसरात रक्षाबंधनाचा उत्साह आणि आपुलकीचे वातावरण निर्माण झाले. या उपक्रमाचे नगराध्यक्षा सुषमा श्रीरामे यांनी कौतुक केले. सामाजिक जाणीव जपणाऱ्या या उपक्रमासाठी त्यांनी विद्यार्थिनी, शिक्षकवृंद आणि आयोजकांचे अभिनंदन करीत आभार मानले.

## सरोज मेश्राम यांना 'महाराष्ट्र उद्योग भूषण' पुरस्काराने सन्मानित

### आतापर्यंत १० हजार महिलांना व्यवसायाचे प्रशिक्षण देत आत्मनिर्भर बनविले

**दै. सिंहवाणी वृत्त, वाडी**

कोरोना काळात वाडी परिसरासह नागपूर शहरात गरजूंना भोजनदान तसेच किराणा साहित्याचे वितरण करून सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या आणि नागपूरसह ग्रामीण भागातील तब्बल १० हजार



महिलांना व्यावसायिक प्रशिक्षण देऊन आत्मनिर्भर बनविणाऱ्या माया महिला बहुउद्देशीय सेवा संस्थेच्या संचालिका सरोज मेश्राम यांना पुणे येथे आयोजित राज्यस्तरीय कार्यक्रमात 'महाराष्ट्र उद्योग भूषण पुरस्कार-२०२६'देऊन सन्मानित करण्यात आले. रिजल्ट डॉट इन संस्था व लघु आणि सूक्ष्म मंत्रालय, भारत सरकार यांच्या वतीने राज्यभरातील व्यवसाय व उद्योजकता क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या निवडक उद्योजकांचा सत्कार पुण्यातील कल्याणीनगर येथील हयात हॉटेलमध्ये आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला सिनेमा क्षेत्रातील अभिनेते जितेंद्र जोशी यांच्यासह वरिष्ठ शासकीय अधिकारी व विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी सरोज मेश्राम यांना प्रशस्तीपत्र व स्मृतिचिन्ह प्रदान करून 'महाराष्ट्र उद्योग भूषण पुरस्कार-२०२६' देऊन गौरविण्यात आले. महिलांना व्यावसायिकदृष्ट्या सक्षम करण्यासोबतच शासनाच्या विविध महिला कल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी त्यांनी केलेल्या कार्याची दखल घेत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

विशेष म्हणजे, सरोज मेश्राम यांच्या माया महिला बहुउद्देशीय सेवा संस्थेला राज्यस्तरावर एका सीएसआर कंपनीसोबत उद्योग व व्यवसाय प्रशिक्षणाच्या उपक्रमासाठी कराराची संधी देखील प्राप्त झाली आहे. त्यामुळे महिलांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या अधिक संधी उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. सरोज मेश्राम यांच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे नागपूर व विदर्भाच्या नावलौकिकात भर पडली आहे. त्यांना मिळालेल्या राज्यस्तरीय पुरस्काराबद्दल प्राचार्य अभय शेंडे, प्राचार्य सुभाष खाकसे, नगरसेवक सुनील हिरणवार, वाडी पत्रकार संघाचे अध्यक्ष गजानन तलमले, सचिव विजय वानखेडे, ममता सयाम, सोनाली भांगे, संयमी देशपांडे, अलिषा मेश्राम, यश ढाकणे आदी मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# अमरावतीतील रुग्णालय आगप्रकरणातील दोषींना सोडणार नाही!

### महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, गरज पडल्यास सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करू, वनहक्क धारकांना मिळणार सातबारा आणि ८-अ उतारे,

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

अमरावती येथील जिल्हा स्त्री रुग्णालयातील आगीची घटना अत्यंत गंभीर असून,या प्रकरणाची सखोल चौकशी सुरू आहे. चौकशीत जो कोणी दोषी आढळेल, त्याला कोणत्याही परिस्थितीत सोडले जाणार नाही.गरज पडल्यास दोषींविरुद्ध सदोष मनुष्यवधाचा गुन्हाही दाखल करण्यात येईल,असा इशारा महसूल मंत्री तथा नागपूर आणि अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिला.

नागपूर विमानतळावर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे बोलत होते. अमरावती येथील जिल्हा स्त्री रुग्णालयातील आगीच्या घटनेची चौकशी करण्यासाठी सोमवारी अमरावतीला गेलो होतो. घटनास्थळाची पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली. गेल्यावर्षी या रुग्णालयातील अग्निशमन यंत्रणा सक्षम करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पालकमंत्री असताना तीन कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला होता.असे असतानाही ही दुर्दैवी घटना कशी घडली, याची सखोल चौकशी केली जात आहे.या चौकशीचा अहवाल आज सायंकाळपर्यंत किंवा उद्या सकाळपर्यंत प्राप्त होण्याची शक्यता आहे.

**व्हेंटिलेटरच्या स्फोटाचीही चौकशी**

अमरावती येथील घटनेत ज्या व्हेंटिलेटरचा स्फोट झाल्याचे सांगितले जात आहे, त्या व्हेंटिलेटरच्या पुरवठ्या बाबतही चौकशी सुरू असल्याचे बावनकुळे यांनी स्पष्ट केले. हाफकिन इन्स्टिट्यूटकडून राज्यात सुमारे दहा हजार व्हेंटिलेटर पुरविण्यात आले होते. अमरावतीच्या रुग्णालयात नेमके कोणते व्हेंटिलेटर बसविण्यात आले होते आणि या दुर्घटनेमागील नेमके कारण काय आहे, याचा तपास करण्यात येत आहे, असे त्यांनी सांगितले.

२०२२ मध्ये सरकारी कंपनी असलेल्या हाफकिन इन्स्टिट्यूटमार्फत व्हेंटिलेटरचा पुरवठा करण्यात आल्याचे सांगितले जात असले तरी अमरावतीतील घटनेमागील वस्तुस्थिती तपासल्यानंतरच निष्कर्ष काढण्यात येईल, असेही बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

**वनहक्क धारकांना मिळणार सातबारा आणि ८-अ उतारे**

दरम्यान, १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत महसूल पंधरवडा साजरा करण्यात येणार असल्याची माहिती बावनकुळे यांनी दिली. या कालावधीत वनहक्क पट्टे मिळालेल्या आदिवासी बांधवांना त्यांच्या जमिनीचे ७/१२ आणि ८-अ उतारे उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

जमिनीच्या हक्काची नोंद अधिकृत अभिलेखात झाल्यानंतर संबंधित आदिवासी शेतकऱ्यांना केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांचा लाभ घेणे शक्य होणार आहे.ज्या आदिवासी बांधवांना अद्याप वनहक्क पट्टे मिळालेले नाहीत किंवा ज्यांच्या दाव्यांवर कार्यवाही झालेली नाही, अशा प्रकरणांचीही नव्याने कार्यवाही करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. ज्यांचे दावे कमी क्षेत्रासाठी मंजूर झाले आहेत, मात्र प्रत्यक्षात त्यांच्याकडे अधिक क्षेत्र आहे, अशा प्रकरणांचे पुनर्विलोकन केले जाईल. तसेच ज्या आदिवासींचे वनहक्क दावे नाकारण्यात आले आहेत,त्यांच्या दाव्यांचाही पुनर्विचार करण्याची योजना आखण्यात आली आहे.यासाठी ग्रामस्तरीय आणि जिल्हास्तरीय वनहक्क समित्या कार्यरत करण्यात येणार असून, यासंदभार्तील शासन निर्णय लवकरच जारी होण्याची शक्यता असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले.

**आदिवासी शेतकऱ्यांना विविध योजनांचा लाभ**

वनहक्क दाव्यांची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर संबंधित आदिवासी शेतकऱ्यांना कर्जमाफीसह केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजनांचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा होईल, असेही बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

**नागपूर-अमरावती विभागात २२ टक्के पावसाची तूट**

पावसाच्या परिस्थितीबाबत बोलताना बावनकुळे म्हणाले की, नागपूर आणि अमरावती विभागात सरासरीपेक्षा सुमारे २२ टक्के पावसाची तूट आहे. सध्या पिकांची परिस्थिती समाधानकारक असली तरी पुढील काळात पावसाचा मोठा खंड पडू नये यासाठी चांगल्या पावसाची आवश्यकता आहे. विदर्भाच्या तुलनेत मराठवाड्यात पावसाची तूट अधिक असल्याचे त्यांनी सांगितले. ज्या भागांत पाऊस कमी झाला आहे, त्या ठिकाणी आगामी काळात समाधानकारक पाऊस होऊन परिस्थिती सुधारेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## पूर्व विदर्भातील ओबीसी संघटनांची बैठक, जनगणनेत स्वतंत्र ओबीसी कॉलम नसल्यास बहिष्कार!



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

जातिनिहाय जनगणनेमध्ये ओबीसींसाठी स्वतंत्र कॉलम असलाच पाहिजे, या प्रमुख मागणीसाठी १ सप्टेंबर २०२६ पासून देशभर धरणे आंदोलन, रास्ता रोको, उपोषण, मोर्चे आणि निदर्शने अशा विविध स्वरूपात महाआंदोलन उभारण्याच्या पार्श्वभूमीवर ओबीसी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक रविवारी नागपूर येथील सिव्हिल लाइन्समधील रविभवनच्या मोठ्या सभागृहात पार पडली.

बैठकीच्या अध्यक्षस्थानी सकल ओबीसी महामोर्चाचे मुख्य संयोजक उमेश कोर्राम होते. पूर्व विदभार्तील सहाही जिल्ह्यांतील विविध ओबीसी संघटनांचे पदाधिकारी व प्रतिनिधी या बैठकीला उपस्थित होते. यावेळी आगामी आंदोलनाची दिशा, जनगणनेतील ओबीसींचा स्वतंत्र कॉलम, गावपातळीवरील जनजागृती, संघटनात्मक बांधणी आणि युवकांचा सहभाग यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीत काही पदाधिकाऱ्यांनी प्रस्ताव मांडला की, जनगणनेसाठी घरी येणाऱ्या कर्मचाऱ्यांचा सन्मान राखत त्यांना स्पष्टपणे सांगण्यात यावे की, जनगणनेत ओबीसींसाठी स्वतंत्र कॉलम नसल्यामुळे आम्ही कोणतीही माहिती देणार नाही. याबाबत गावागावांत जनजागृती करण्याची गरजही व्यक्त करण्यात आली.

जनगणना करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणाबाबतही काही उपस्थितांनी प्रश्न उपस्थित केले. कर्मचाऱ्यांना केवळ सात दिवसांचे प्रशिक्षण देण्यात आल्याचा दावा बैठकीत करण्यात आला. जनगणनेची प्रक्रिया चुकीच्या पद्धतीने होत असल्याचे आढळल्यास त्याविरोधात भूमिका घेण्याचा विचारही मांडण्यात आला.

१ सप्टेंबरपासून आंदोलन एकाच स्वरूपात न करता विविध भागांमध्ये स्थानिक परिस्थितीनुसार मोर्चे, निदर्शने, धरणे, रास्ता रोको आणि उपोषण अशा वेगवेगळ्या माध्यमांतून आंदोलन करण्याबाबत चर्चा झाली. विविध तालुक्यांना जोडणाऱ्या महत्त्वाच्या मार्गांवर आंदोलन करून प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधण्याची सूचना एका पदाधिकाऱ्याने केली.

विशेषतः जेन झी आणि तरुण पिढीला ओबीसी चळवळीशी जोडण्याची आवश्यकता कोर्राम यांनी अधोरेखित केली. ओबीसी विद्यार्थ्यांच्या गुणगौरवाचे कार्यक्रम आयोजित करून विद्यार्थी आणि युवकांपर्यंत चळवळीचे विचार पोहोचवावेत, अशी सूचनाही मांडली. यंदाचे वर्ष महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जन्मद्विशताब्दीशी संबंधित असल्याचा उल्लेख करत सामाजिक समता, शिक्षण आणि बहुजन समाजाच्या हक्कांसाठी त्यांनी केलेल्या कायार्तून प्रेरणा घेऊन ओबीसी समाजाने संघटित होण्याचे आवाहन बैठकीत करण्यात आले.

बैठकीत ज्ञानेश्वर गोरे, डॉक्टर विलास काळे, एडवोकेट अंजली साळवे,प्रा.रमेश पिसे, गोपाल सेलोकर, राजेश काकडे, अशोक काकडे,सुषमा भड ,मीरा मदनकर, बोंदिरवार , राजेंद्र बढिये, डॉक्टर अभीविलास नखाते, सुरेश जिचकार,सतीश मालेकर, मोहन हरडे, श्रीकृष्ण पडोळे, संजय मते, मोंटू पिलारे,मनीष गिरडकर, पियुष आखरे, कृतल आकरे आणि इतर ओबीसी कार्यकर्ते उपस्थित होते.

## अबब! ऐकावे ते नवलचं

### नगराध्यक्षांच्या घरची घरफोडी पोलिसांच्या लेखी 'अदखलपात्र'!, तक्रार होऊन आठवडा उलटला; पोलिसांची चौकशी मात्र अजूनही 'वाटेवर'च?

**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

नगराध्यक्षांच्या घराची दिवसाढवळ्या घरफोडी होते, चोरटा घरात घुसून गुल्लक फोडतो आणि पैसे लंपास करतो. घरातील मंडळी घरी परतल्यानंतर चोरी उघडकीस येते. पोलिसांना माहिती दिली जाते. पोलीस घटनास्थळी येतात, पाहणी करतात आणि निघून जातात. दुसऱ्या दिवशी तक्रारही दाखल होते. पण पुढे काय? पोलिसांच्या लेखी ही गंभीर घरफोडी अदखलपात्र ठरते! भिवापूर पोलिसांच्या या अजब कार्यपद्धतीची सध्या शहरात जोरदार चर्चा सुरू आहे. गत २३ ऑगस्ट रोजी नगराध्यक्षा सुषमा श्रीरामे यांच्या घरी दिवसाढवळ्या चोरीची घटना घडली. घरात कोणीही नसल्याची संधी साधून अज्ञात चोरट्याने मागील दरवाजाची साखळी काढून घरात प्रवेश केला. त्यानंतर घरातील गुल्लक फोडून त्यातील रक्कम लंपास केली.

सायंकाळी नगराध्यक्षा सुषमा श्रीरामे व त्यांच्या कुटुंबीयांनी घरी परतल्यानंतर चोरीचा प्रकार उघडकीस आला. तत्काळ पोलिसांना माहिती देण्यात आली. दोन पोलीस कर्मचारी घटनास्थळी पोहोचले, पाहणी केली आणि परत गेले. मात्र त्यानंतर तपासाची गाडी कुठे अडकली, हा प्रश्न अनुत्तरितच आहे. २४ ऑगस्ट रोजी नगराध्यक्षांच्या आई निर्मला शंकरराव श्रीरामे (वय ६५) यांनी भिवापूर पोलीस ठाण्यात जाऊन रीतसर तोंडी तक्रार दिली. मात्र या घरफोडीच्या घटनेची पोलिसांनी 'अदखलपात्र गुन्हा' म्हणून नोंद केली.

**तक्रार झाली; चौकशी मात्र गायब!**

तक्रार दाखल होऊन तब्बल आठवडा उलटला. मात्र चौकशी करण्यासाठी पोलीस फिरकले नाही. नगराध्यक्षांच्या घरात घडलेल्या चोरीची अशी बोळवण होत असेल, तर सामान्य नागरिकांच्या घरात चोरी झाल्यानंतर पोलिसांकडून किती तत्परता दाखविली जात असेल, याची कल्पनाच केलेली बरी!

**'दखल' घेण्याची जबाबदारी कोणाची?**

घरफोडी, चोरी, घटनास्थळाची पाहणी, तक्रार—या सगळ्या बाबी घडूनही तपास यंत्रणा मात्र सुस्तावलेली दिसत आहे. नगराध्यक्षांच्या घरची चोरीही पोलिसांच्या दृष्टीने 'अदखलपात्र' असेल, तर मग पोलिसांच्या दृष्टीने 'दखलपात्र' नेमके काय? असा संतप्त सवाल नागरिकांतून उपस्थित होत आहे.

# सुटीच्या दिवशीही महावितरणचा थकबाकी वसुलीचा धडाका





**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

वीजबिलापोटी असलेल्या थकबाकीची वसुली करण्यासाठी महावितरणतर्फे राज्यभरात अत्यंत कठोर पावले उचलण्यात येत असून, याचा प्रत्यय नुकताच सलग सुट्ट्यांच्या दिवशी आला. शनिवार व रविवार या सुट्ट्यांच्या दिवशीही नागपूर आणि वर्धा जिल्ह्यात महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विश्रांती न घेता थकबाकी वसुलीची मोहीम अतिशय आक्रमकपणे राबविली. मोहिमेदरम्यान अधिकाऱ्यांनी थकबाकीदार ग्राहकांच्या थेट घरी प्रत्यक्ष भेट देऊन त्यांना वीजबिलांचा नियमित भरणा करण्याचे नम्र आवाहन केले. तसेच, वारंवार सांगून व संधी देऊनही थकबाकीचा भरणा न करणाऱ्या ग्राहकांचा वीजपुरवठा जागीच खंडित करण्याची कठोर कारवाई करण्यात आली.

या विशेष मोहिमेचे महत्त्व लक्षात घेता, महावितरणच्या नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता राजेश नाईक हे स्वतः मैदानात उतरले होते. त्यांनी मानेवाडा आणि खापरी भागात प्रत्यक्ष उपस्थित राहून वसुली मोहिमेत सहभाग घेतला, तर सोमवारी त्यांनी हिंगणघाट येथील मोहिमेची धुरा सांभाळत प्रत्यक्ष पाहणी केली. या व्यापक मोहिमेत नागपूर ग्रामीण मंडलाचे अधीक्षक अभियंता संजय वाकडे, नागपूर शहर मंडलाचे अधीक्षक अभियंता प्रफुल लांडे, वर्धा मंडलच्या अधीक्षक अभियंता स्मिता पारखी यांच्यासह परिमंडलातील सर्व कार्यकारी अभियंते, उपविभागीय अभियंते, सहायक अभियंते तसेच तांत्रिक व अतांत्रिक कर्मचारी मोठ्या संख्येने व उत्साहाने सहभागी झाले होते.

थकबाकीदारांविरुद्ध महावितरणने आता पूर्णपणे कंबर कसली असून संपूर्ण परिमंडलात ही मोहीम युद्धपातळीवर सुरू आहे. मात्र, या मोहिमेदरम्यान वीजपुरवठा खंडित केल्यानंतर अनेक ग्राहक शेजाऱ्यांकडून वायर टाकून बेकायदेशीरपणे वीज वापरत असल्याचे समोर आले आहे. अशा प्रकारांची गंभीर दखल घेत महावितरणने आता थेट फौजदारी गुन्हा दाखल करण्याचा कडक इशारा दिला आहे. कायदेशीर तरतुदीनुसार, थकबाकीमुळे अधिकृत वीज कापली गेल्यानंतर शेजाऱ्याकडून वीज घेणे हा अत्यंत गंभीर गुन्हा असून ती थेट 'वीजचोरी' मानली जाते. या प्रकरणी महावितरण संबंधित ग्राहकावर तत्काळ पोलीस तक्रार करून कायदेशीर कारवाई करणार आहे.

भारतीय वीज कायद्यानुसार वीज विक्री आणि वितरणाचे सर्व कायदेशीर हक्क केवळ महावितरणकडेच सुरक्षित आहेत. त्यामुळे कोणताही ग्राहक आपल्या घरचे कनेक्शन इतरांना देऊ शकत नाही; असे करणे पूर्णपणे नियमबाह्य असून तो वितरणाच्या अधिकाराचा थेट भंग ठरतो. याशिवाय, जर एखाद्या ग्राहकाचे एकाच नावावर दोन वेगवेगळे कनेक्शन असतील आणि एका ठिकाणची थकबाकी भरली गेली नाही, तर ती थकबाकीची रक्कम संबंधित ग्राहकाच्या दुसऱ्या सक्रिय कनेक्शनवर वळती केली जाणार आहे. परिणामी, वेळेवर पैसे न भरल्यास ते दुसरे चालू कनेक्शनदेखील खंडित केले जाऊ शकते.

आगामी काळातील वीजवितरण प्रणाली आणखी पारदर्शक करण्यासाठी नवीन स्मार्ट मीटर प्रणालीमध्ये 'ऑटो डिस्कनेक्ट' ही अत्याधुनिक सुविधा समाविष्ट करण्यात आली आहे. ठरवून दिलेल्या मुदतीत बिल न भरल्यास मानवी हस्तक्षेपाशिवाय या प्रणालीद्वारे आपोआप वीजपुरवठा खंडित होतो. त्यामुळे ग्राहकांनी वीजपुरवठा अखंडित ठेवण्यासाठी विहित मुदतीत आपली देयके भरणे अनिवार्य आहे. ग्राहकांनी महावितरणला सहकार्य करून थकबाकीचा त्वरित भरणा करावा आणि वीज खंडित झाल्यावर शेजाऱ्याकडून वीज घेण्यासारखे बेकायदेशीर प्रकार पूर्णपणे टाळावेत, अन्यथा आढळल्यास कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल. तसेच स्मार्ट मीटर धारकांनी विहित मुदतीत बिले भरून संभाव्य गैरसोय टाळावी, असे आवाहन नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता राजेश नाईक यांनी केले आहे.

थोडक्यात

## नवनियुक्त केंद्रप्रमुख इंद्रायणी थुलकर यांचा सत्कार



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

शिक्षिका इंद्रायणी थुलकर यांची खात केंद्राचे केंद्रसमन्वयक (केंद्रप्रमुख) म्हणून नुकतीच नियुक्ती झाल्याबद्दल महाराष्ट्र जि. प. मागासवर्गीय शिक्षक संघटना, शाखा मौदा यांच्या वतीने त्यांचा शाल व गुलाबाचे पुष्पगुच्छ देऊन सत्कार करून अभिनंदन करण्यात आले. यावेळी संघटनेचे अध्यक्ष सुकराम रामटेके यांच्यासह विनोद हुमणे, सुदेंद्र सुखदेवे, मच्छिंद्र कांबळे, सुरेंद्र डोंगरे, अरुण वाघमारे, विनोद बोरकर,नंदेश गजभिये तसेच संघटनेचे इतर पदाधिकारी उपस्थित होते. नवनियुक्त केंद्रप्रमुख इंद्रायणी थुलकर यांच्या प्रशासकीय व शैक्षणिक कार्याचा अनुभव केंद्रातील शाळांना निश्चितच लाभदायी ठरेल, असा विश्वास यावेळी उपस्थितांनी व्यक्त केला. संघटनेच्या वतीने त्यांच्या नवीन जबाबदारीसाठी हार्दिक अभिनंदन करून पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी उपस्थित पदाधिकाऱ्यांनी केंद्रप्रमुख थूलकर यांच्या कार्यकाळासाठी सदिच्छा व्यक्त करत, शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी त्यांच्या नेतृत्वाखाली सकारात्मक व प्रभावी कार्य घडेल, अशी अपेक्षा व्यक्त केली.

## वाकी नगरी सजणार ताजुद्दीन बाबांच्या उर्ससाठी ३ सप्टेंबरला संदल मिरवणूक

### झेंडावंदन, चादर अर्पण, महाप्रसाद अन् मिलाद-कव्वालीचा रंगणार भक्तिमय सोहळा

**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**

श्री क्षेत्र वाकी येथे श्री बाबा ताजुद्दीन औलिया यांच्या सहामाही उर्सनिमित्त ३ सप्टेंबर रोजी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन



करण्यात आले आहे. या पवित्र सोहळ्यासाठी दरवर्षीप्रमाणे यंदाही परिसरातील तसेच दूरवरून मोठ्या संख्येने भाविक वाकी येथे दाखल होणार आहेत. राष्ट्रीय एकता व अखंडतेचा संदेश देणारे श्री बाबा ताजुद्दीन औलिया यांनी आपल्या जीवनातील १२ वर्षांचा कालावधी वाकी येथे व्यतीत केला. त्यांच्या चरणस्पर्शाने पावन झालेल्या या भूमीत होणाऱ्या उर्सला भाविकांच्या श्रद्धेत विशेष स्थान आहे. उर्सनिमित्त गुरुवारी, ३ सप्टेंबर रोजी दुपारी २ वाजता प.पू. श्री काशिनाथ नाना डहाके पाटील यांच्या वाकी येथील निवासस्थानातून (वाडा) भव्य संदल मिरवणुकीला सुरुवात होईल. वाकी गावातून मार्गक्रमण करीत संदल सायंकाळी ६ वाजता वाकी दरबारात पोहोचेल. त्यानंतर परंपरेनुसार सज्जादा नशीन श्री ज्ञानेश्वरराव डाहाके पाटील यांच्या हस्ते झेंडावंदन करण्यात येईल. बाबांच्या मजारवर चादर अर्पण केल्यानंतर उर्सला विधिवत सुरुवात होईल. उर्सनिमित्त भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून, रात्री ८ वाजता मिलाद व कव्वालीचा विशेष कार्यक्रम होणार आहे. ४ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता कुल शरीफचा कार्यक्रम पार पडणार असून, त्यानंतर सहामाही उर्सची सांगता होईल. या भक्तिमय सोहळ्याचा लाभ घेण्यासाठी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्री बाबा ताजुद्दीन औलिया यांचे दर्शन व आशीर्वाद घ्यावेत, असे आवाहन श्री बाबा ताजुद्दीन दर्गा वाकी ट्रस्टचे अध्यक्ष तथा सज्जादा नशीन श्री प्रभाकरजी डाहाके पाटील यांनी केले आहे.

## प्रसूतीनंतर पुन्हा मातामृत्यू, नवजात बाळाचाही मृत्यू

### गडचिरोलीत आठ दिवसांत दुसरी घटना, रक्त उपलब्ध होण्यास विलंब झाल्याचा नातेवाईकांचा आरोप

**दै. सिंहवाणी वृत्त, गडचिरोली**

गडचिरोली येथील जिल्हा महिला व बाल रुग्णालयात प्रसूतीनंतर अतिरक्तस्राव झाल्याने २८ वर्षीय महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. नाजुका दिवाकर राऊत (२८, रा. कोजबी, ता. नागभीड, जि. चंद्रपूर) यांचा शनिवारी मध्यरात्री मृत्यू झाला. त्यांच्या नवजात बाळाचाही प्रसूतीनंतर काही वेळातच मृत्यू झाला. विशेष म्हणजे, याच रुग्णालयात आठ दिवसांत झालेला हा दुसरा मातामृत्यू असल्याने आरोग्य व्यवस्थेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. नाजुका राऊत यांना प्रसूतीसाठी बोदली येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातून २८ ऑगस्ट रोजी रात्री १.२३ वाजता गडचिरोलीच्या जिल्हा महिला व बाल रुग्णालयात दाखल करण्यात आले. दुसऱ्या दिवशी सकाळी सुमारे सहा वाजता त्यांची सामान्य प्रसूती झाली. त्यांनी अडीच किलो वजनाच्या बाळाला जन्म दिला. मात्र, जन्मानंतर काही वेळातच नवजात बाळाचा मृत्यू झाला. यानंतर सकाळी सुमारे आठ वाजता नाजुका यांना मोठ्या प्रमाणात रक्तस्राव सुरू झाला. रक्तस्राव वाढत गेल्याने त्यांची प्रकृती गंभीर बनली. परिस्थिती लक्षात घेऊन ज्येष्ठ स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. प्रवीण किलनाके आणि डॉ. प्रशांत आखाडे यांना पाचारण करण्यात आले. डॉक्टरांनी रुग्णालयात दाखल होऊन महिलेची तपासणी केली. रक्तस्राव नियंत्रणात आणण्यासाठी शस्त्रक्रियेसह आवश्यक उपचार करण्यात आले.

उपचारानंतर रक्तस्राव थांबला आणि नाजुका यांना रक्त देण्यात आले. दुपारी तीनच्या सुमारास त्यांच्या प्रकृतीत काहीशी सुधारणा झाल्याचे सांगण्यात आले. सायंकाळी सात ते आठ वाजेपर्यंत त्यांची प्रकृती स्थिर होती. मात्र, मध्यरात्रीनंतर अचानक त्यांना झटके येण्यास सुरुवात झाली. डॉक्टरांकडून उपचार सुरू असतानाच रात्री दिडच्या सुमारास त्यांचा मृत्यू झाला.

# अर्थसंकल्पातील मंजूर निधी ओबीसी मंत्रालयाला द्या!

### ओबीसी मंत्रीमंडळ उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची अधिकाऱ्यांना तंबी, ओबीसी महामंडळांचे प्रश्न डिसेंबरपर्यंत मार्गी!, परदेशी शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थी संख्या वाढविणार, बैठकीत १३ हून अधिक मुद्द्यांवर सविस्तर चर्चा

**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**

ओबीसींसाठी अर्थसंकल्पातील मंजूर निधी वित्त विभागाने ओबीसी विभागाला तातडीने द्यावा, अशी तंबी ओबीसी उपसमितीचे अध्यक्ष व महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अधिकाऱ्यांना दिली. ते म्हणाले, हा निधी द्यावा असे कायदेशीर बंधन असतानाही अधिकाऱ्यांनी वेळकाढूपणा केला आहे.

मंत्री छगन भुजबळ, गुलाबराव पाटील, संजय राठोड यांनी निधी विलंबावर खंत व्यक्त केल्याने, बावनकुळे यांनी अधिकाऱ्यांना जाब विचारला.

मंत्रालयात परिषद सभागृहात महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली ओबीसी मंत्रीमंडळ उपसमितीची महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली. या बैठकीला मंत्री छगन भुजबळ, गुलाबराव पाटील, संजय राठोड, अतुल सावे, गणेश नाईक यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

बैठकीनंतर उपसमिती अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, राज्यातील ओबीसी विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहांना जागा उपलब्ध करून देणे, प्रलंबित शिष्यवृत्तीची रक्कम अदा करणे आणि ३६ ओबीसी जातींचा केंद्राच्या यादीत समावेश करणे अशा सुमारे १३ ते १४ महत्त्वाच्या मुद्द्यांवर ओबीसी मंत्रीमंडळ उपसमितीच्या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच, ओबीसी महामंडळांच्या निधीचा प्रश्न येत्या डिसेंबरपर्यंत मार्गी लावण्याचा आणि काही विषय राज्य नियोजन समितीकडे पाठविण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय झाला. ओबीसीमधील सर्व समाजाला न्याय देण्याची भूमिका सरकारची आहे, असे सांगून ते म्हणाले, राज्यातील ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या योजना आणि महामंडळांच्या



सक्षमीकरणासाठी शासन कटिबद्ध असून, कोणत्याही महामंडळाला किंवा योजनांना निधीची कमतरता भासू देणार नाही.

**महाज्योती आणि इतर महामंडळांच्या निधीबाबत निर्णय**

- **निधीचा आढावा:** 'महाज्योती'सह सर्व महामंडळांना प्रत्येकी ३०० कोटी रुपये देण्यात आले आहेत. मात्र, महाज्योतीने १ हजार कोटी रुपयांची मागणी केली आहे. निधीअभावी कोर्सेस बंद पडल्याची बाब समोर आल्यावर, ३०० कोटींचा निधी का कमी पडत आहे, याची कारणमीमांसा उपसमितीसमोर ठेवण्याचे आणि त्यानंतर तो प्रस्ताव मंत्रीमंडळासमोर आणण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.
- **प्रलंबित बिले:** १२५ कोटी रुपयांची प्रलंबित बिले तातडीने अर्थ विभागाकडे पाठविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.
- **पीएचडी फेलोशिप:** 'महाज्योती'च्या पीएचडी फेलोशिपचे १२६ कोटी रुपयांचे प्रलंबित दायित्व असून, डिसेंबरपर्यंत हा सर्व निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे.
- **वनार्टी संस्था:** संस्थेकडे सध्या ५० कोटींचा निधी असून ३०० कोटींची मागणी करण्यात आली आहे. हा प्रस्ताव राज्य नियोजन समितीकडे पाठविण्याचे निर्देश देण्यात आले.

**शिक्षण, शिष्यवृत्ती आणि वसतिगृह सुविधा**

- **परदेशी शिष्यवृत्तीत घसघशीत वाढ:** ओबीसी विद्यार्थ्यांसाठी परदेशी शिष्यवृत्तीची मयार्दा ७५ वरून वाढवून आता २०० विद्यार्थ्यांपर्यंत वाढविण्याच्या मुद्यावरही सकारात्मक चर्चा करण्यात आली.
- **ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना:** या योजनेसाठी पालकांच्या उत्पन्नाची मयार्दा १ लाख रुपयांवरून थेट ८ लाख रुपयांपर्यंत वाढविण्याचा प्रस्ताव एसपीसीकडे पाठविण्यात आला आहे.
- **उच्च शिक्षण आणि वसतिगृह:** उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी 'पीपीपी' मॉडेल तयार करण्यात येणार आहे.
- **शिष्यवृत्ती निधी:** विद्यार्थ्यांच्या प्रलंबित शिष्यवृत्ती अदा करण्यासाठी ४,१३४ कोटी रुपयांची आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. मात्र, 'अगेन्स्ट कॅप' प्रवेशित विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाणार नाही, हे स्पष्ट करण्यात आले.

**प्रशासकीय आणि इतर महत्त्वाचे निर्णय :**

- रोजगार व स्पर्धा परीक्षा: प्रशासनात मराठी टक्का वाढावा यासाठी आयबीपीएस आणि आयआरबी मार्फत पावले उचलली जात असून, युपीएससी आणि एमपीएससी प्रशिक्षणार्थींच्या जागा वाढविण्याची मागणीही करण्यात आली आहे.
- आश्रमशाळा: निवासी आश्रमशाळांमध्ये सुविधा वाढविण्यासाठी गतवर्षीची ४८ कोटींची बिलेही द्यायची आहेत. यासाठी २०० कोटींची मागणी असून, ४०४२ कोटींचा नियतव्यय मंजूर झाला आहे. तसेच सर्व आश्रमशाळांवर प्रशासक नेमण्यात आले आहेत.
- आत्महत्याग्रस्त कुटुंबांना दिलासा: नैराश्यातून आत्महत्या केलेल्या नागरिकांच्या कुटुंबांना मदत करणे आणि त्यांच्या वारसाला शासकीय नोकरी देण्याबाबत नावासहित प्रस्ताव मागविण्याच्या सूचनाही बैठकीत देण्यात आल्या.
- आधुनिकता आणि ई-प्रशासन: विभागाच्या प्रादेशिक कार्यालयांसाठी नवीन 'इलेक्ट्रिक वाहने' खरेदी करण्यात येणार आहेत. तसेच, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालयासाठी दोन माहिती तंत्रज्ञान सल्लागारांच्या सेवा उपलब्ध करून घेण्याबाबतही चर्चा करण्यात आली.

## पार्किंग व्यवस्थापनासाठी मनपा आयुक्तांची बैठक

### नागपुरातील रस्त्यांवरील वाहतूक कोंडी दूर करण्याचे लक्ष्य

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर शहरातील वाढती वाहतूक कोंडी तसेच पार्किंग व्यवस्थेच्या अडचणींवर प्रभावी तोडगा काढण्याच्या उद्देशाने नागपूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. विपीन यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी (ता. १) मनपा मुख्यालयात रस्त्यावरील पार्किंग व्यवस्थापन व संबंधित उपाययोजनांबाबत आढावा बैठक पार पडली.

बैठकीला मनपाचे अतिरिक्त आयुक्त अंकित, नागपूर शहर वाहतूक पोलीस उपायुक्त आदित्य मिरखेलकर, मुख्य अभियंता लीना उपाध्ये, उपायुक्त मंगेश खवले, झोनचे सहाय्यक आयुक्त तसेच आयटीडीपी इंडिया, पीडीए पुणे आणि आयआरटीई या तज्ज्ञ संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित



होते.

शहरातील वाहतूक कोंडीच्या दृष्टीने महत्त्वाच्या प्रमुख रस्त्यांची नोंद करून तेथे होणाऱ्या अनधिकृत पार्किंगची समस्या दूर करण्यासाठी झोनस्तरावर नियोजन करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले. प्रत्येक झोनमधील प्रमुख रस्त्यांवर उपलब्ध जागांचा शोध घेऊन नागरिकांसाठी योग्य ठिकाणी पार्किंगची सुविधा निर्माण करण्याच्या दृष्टीने प्रत्येक रस्त्याचे मॅपिंग तातडीने तयार करून सादर करण्याचेही त्यांनी निर्देशित केले.

शहरातील विविध झोनमधील वाहतूक कोंडीच्या प्रमुख ठिकाणांची नोंद करून प्रमुख रस्त्यांवरील वाहतूक कोंडी कमी करून ती प्रभावीपणे दूर करण्याचे लक्ष्य बैठकीत निश्चित करण्यात आले. यासाठी आवश्यक त्या ठिकाणी मनपाच्या माध्यमातून नियोजित व शिस्तबद्ध पार्किंग सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सर्वंकष व्यवस्था उभारण्याचे निर्देश देण्यात आले.

दरम्यान, पार्किंगची अधिकृत सुविधा उपलब्ध करून दिल्यानंतरही तिचा वापर न करता अनधिकृत ठिकाणी वाहने उभी करून वाहतूक कोंडीस कारणीभूत ठरणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करण्यासाठी आवश्यक नियमांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे ही निर्देश आयुक्तांनी दिले. यासाठी आवश्यक नियोजन, कार्यपद्धती आणि अंमलबजावणीची तयारी तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

शहरातील वाढती वाहतूक कोंडी आणि पार्किंगच्या समस्येवर कायमस्वरूपी व प्रभावी उपाययोजना करण्यासाठी सर्वंकष पार्किंग व्यवस्थापन व वाहतूक नियोजनाचा कृती आराखडा सादर करण्याचे निर्देश मनपा आयुक्त डॉ. विपीन यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

## दीक्षाभुमीवर आवश्यक सुविधांची नियोजनबद्ध तयारी करा!

### महापौरांनी घेतला धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या पूर्व तयारीचा आढावा



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या अनुषंगाने दीक्षाभूमीवर येणाऱ्या लाखो बौद्ध अनुयायांच्या सोयीसाठी नागपूर महानगरपालिकेद्वारे विविध सुविधांची व्यवस्था करण्यात येते. या सर्व आवश्यक सुविधांची नियोजनबद्ध पूर्व तयारी करावी, तसेच दीक्षाभूमी येथे व्यवस्थेत असणाऱ्या सर्व विभागांनी समन्वयाने कार्य करावे, असे निर्देश महापौर निता ठाकरे यांनी दिले. धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या अनुषंगाने दीक्षाभूमीवरील सुविधांचा आढावा महापौर निता ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी (ता.१) घेण्यात आला. धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त देशभरातून लाखोंच्या संख्येत बौद्ध अनुयायी नागपूर शहरातील दीक्षाभूमीला भेट देतात. या सर्व नागरिकांच्या सोयीसाठी नागपूर महानगरपालिकेद्वारे १८ ते २२ ऑक्टोबर या कालावधीमध्ये सर्व मुलभूत सुविधांची व्यवस्था करण्याचे निर्देश महापौर निता ठाकरे यांनी बैठकीमध्ये दिले. नागरिकांची गैरसोय होऊ नये तसेच त्यांना तात्काळ मदत मिळावी यासाठी नियंत्रण कक्ष स्थापन करणे, संपूर्ण परिसरात स्वच्छता राखणे, सर्वत्र विद्युत पुरवठा करणे, पिण्याचे पाणी, शौचालय, परिवहन सेवा या सर्व सुविधा सुरळीतपणे चालविल्या जातील, या दृष्टीने नियोजन करण्याचेही त्यांनी निर्देशित केले.

## फळबागा उद्ध्वस्त, संत्रा-मोसंबी उत्पादक शेतकरी संकटात!

### हेक्टरी लाखाच्या मदतीसाठी काँग्रेस आक्रमक

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

काटोल व नरखेड तालुक्यातील संत्रा व मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांच्या बागांना प्रतिकूल हवामान, अपुरा पाऊस, तापमानातील चढ-उतार आणि रोगराईचा मोठा फटका बसला आहे. झाडांवरील फळांची मोठ्या प्रमाणात गळती होत असल्याने उत्पादनात लक्षणीय घट होण्याची शक्यता निर्माण झाली असून, वर्षभर बागांसाठी केलेला खर्चही भरून निघणे कठीण झाले आहे. हातातोंडाशी आलेले पीक डोळ्यांदेखत वाया जात असल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या गंभीर परिस्थितीची शासनाने तातडीने दखल घेऊन नुकसानग्रस्त संत्रा व मोसंबी बागांचे प्रत्यक्ष पंचनामे करावेत आणि शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपये आर्थिक मदत द्यावी, या मागणीसाठी काँग्रेस पक्ष आक्रमक झाला आहे.

यासंदर्भात शहर काँग्रेस, तालुका काँग्रेस आणि युवक काँग्रेस नरखेडच्या वतीने नरखेड तहसीलदारांना निवेदन देण्यात आले. प्रशासनाने कार्यालयात बसून कागदोपत्री पाहणी न करता



प्रत्यक्ष शेतशिवारात जाऊन नुकसानग्रस्त बागांची पाहणी करावी, फळगळतीचे प्रमाण निश्चित करावे आणि वस्तुनिष्ठ पंचनामे करून तातडीने शासनाकडे नुकसानभरपाईचा प्रस्ताव पाठवावा, अशी मागणी करण्यात आली.

काटोल व नरखेड तालुका हा संत्रा उत्पादनाचा महत्त्वाचा पट्टा असून, हजारो शेतकऱ्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह फळबागांच्या उत्पन्नावर अवलंबून आहे. बागांची लागवड, खत, औषध फवारणी, सिंचन, मजुरी तसेच वर्षभराच्या संगोपनासाठी शेतकऱ्यांनी मोठी गुंतवणूक केली आहे. मात्र, फळधारणेच्या काळातच हवामानाचा फटका बसल्याने मोठ्या प्रमाणात फळगळ होत आहे. त्यातच रोगराईचा प्रादुर्भाव वाढल्याने उत्पादन आणि फळांची गुणवत्ता या दोन्हींवर परिणाम झाला आहे.

वर्षभर कष्ट करून उभ्या केलेल्या बागेतून चांगले उत्पन्न मिळेल, या आशेवर शेतकरी आर्थिक नियोजन करतात. बँकांचे कर्ज, शेतीचा खर्च, मजुरी आणि कुटुंबाच्या गरजा भागविण्यासाठी फळबागेच्या उत्पन्नाकडे त्यांचे लक्ष असते. मात्र, यंदा अपेक्षित उत्पादनच मिळण्याची शक्यता कमी झाल्याने अनेक शेतकऱ्यांसमोर कर्जफेडीचा आणि पुढील हंगामाचा खर्च उभा करण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

नुकसानग्रस्त बागांचे पंचनामे करताना केवळ अंदाजे नुकसान नोंदवू नये, तर प्रत्यक्ष झाडांची पाहणी करून फळगळतीचे प्रमाण, रोगराईमुळे झालेले नुकसान आणि उत्पादनातील संभाव्य घट याची अचूक नोंद करावी, अशी मागणी काँग्रेसने केली आहे. पंचनाम्याच्या प्रक्रियेत पात्र शेतकरी मदतीपासून वंचित राहू नयेत, यासाठी प्रशासनाने विशेष पथके नियुक्त करून गावागावांत पाहणी करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, संत्रा व मोसंबी बागांवरील रोगराईमुळे शेतकऱ्यांची चिंता आणखी वाढली आहे. कृषी विभागाने तातडीने शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचून बागांची पाहणी करावी, रोगांचे निदान करून प्रभावी उपाययोजना सुचवाव्यात, आवश्यक औषधोपचार आणि फवारणीबाबत तांत्रिक मार्गदर्शन द्यावे, अशी मागणी करण्यात आली. केवळ नुकसानभरपाई देऊन प्रश्न सुटणार नसून भविष्यातील उत्पादन वाचविण्यासाठी कृषी विभागाने कायमस्वरूपी मार्गदर्शन व्यवस्था उभी करावी, अशी अपेक्षाही शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

नुकसानग्रस्त फळ उत्पादकांना हेक्टरी एक लाख रुपये आर्थिक मदत देण्याबरोबरच शासनाच्या विविध योजनांचा लाभ तातडीने मिळवून द्यावा, बागांच्या पुनर्बांधणीसाठी आवश्यक मदत करावी आणि नुकसानभरपाईची प्रक्रिया लालफितीत न अडकवता जलदगतीने पूर्ण करावी, अशी मागणी काँग्रेसने केली आहे. शासनाने शेतकऱ्यांच्या संयमाचा अंत पाहू नये, अन्यथा परिस्थिती अधिक गंभीर होण्याची शक्यता असल्याचा इशाराही देण्यात आला.

निवेदन देताना नगर काँग्रेस कमिटी नरखेडचे अध्यक्ष नईम कुरेशी, युवक काँग्रेस काटोल-नरखेड विधानसभा अध्यक्ष मंगेश रामदे, काँग्रेस कमिटीचे महासचिव ऋषिकेश पोतदार, युवक काँग्रेस नरखेड तालुका अध्यक्ष सुरज काकडे, अशोक बालपांडे, चिंटू राठोड, सुखदेव भोयर, सुरेंद्र ठाकरे, जय सातपुते, सुरत चरपे, गजानन निबूरकर, विनोद काळे, सुरेंद्र लाडूकर, आशिष अजय डावरे, प्रवीण कराये बाणाईत, आर्यन नखले यांच्यासह शेकडो संत्रा व मोसंबी उत्पादक शेतकरी उपस्थित होते.

शेतकऱ्यांच्या बागांचे प्रत्यक्ष पंचनामे करून नुकसानीची वस्तुनिष्ठ नोंद करावी. वर्षभर कष्ट आणि मोठा खर्च करून उभ्या केलेल्या बागांचे नुकसान झाले असून, शासनाने शेतकऱ्यांना तातडीने हेक्टरी एक लाख रुपये मदत द्यावी. योग्य आर्थिक मदत मिळाली नाही तर शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कासाठी काँग्रेस रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करेल, असा इशारा युवक काँग्रेस काटोल-नरखेड विधानसभा अध्यक्ष मंगेश रामदे यांनी दिला.

आता प्रशासनाकडून नुकसानग्रस्त बागांची प्रत्यक्ष पाहणी आणि पंचनामे कधी सुरू होतात, तसेच शासनाकडून फळ उत्पादक शेतकऱ्यांसाठी कोणता मदतीचा निर्णय घेतला जातो, याकडे काटोल व नरखेड तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

थोडक्यात

## 'श्रीकृष्ण गीत गवळण संध्या' ३ सप्टेंबर रोजी

### श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त विशेष आयोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**




श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त सुरभक्ती संगीत प्रस्तुत आणि तांडव क्रिएशन, कलाकार मंच व महामृत्युंजय कल्याणकारी संस्था यांच्या सहकार्याने 'श्रीकृष्ण गीत गवळण संध्या' या संगीतमय कार्यक्रमाचे गुरुवार, ३ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६.३० वाजता रेशीमबाग येथील कविवर्य सुरेश भट सभागृहात आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे यंदा पाचवे वर्ष आहे. या कार्यक्रमात चेतन बालपांडे, कुणाल पांडे, अभिषेक मेश्राम, आदित्य वाशिमकर, अमन भांडारकर, मिताली आनंद, सुरभी उबाळे, अभय मोहोड, वैष्णवी कुंभलवार, कुणाल घुगरे, तन्मय वानखेडे, चिरंजीव सोनवाने, आमोद काळे, श्रेया सालोडकर, साक्षी वातकर, साची जैन, रेणुका काळे, गौरी थुबाळकर, मैत्रेय मोहरील, इंद्राणी इंदूरकर आणि मंथन वीणा हे गायक-गायिका आपल्या सुरांनी रंगत वाढवणार आहेत.

तर निखिल शेवेकर (पर्कशन), यशस्व मानकर (तबला), आदित्य बोडे व चिंतामणी राजक (बासरी), अक्षत जाधव (हार्मोनियम), मनोज कुकवास व प्रज्योत कल्याण (कीबोर्ड), निखिल खडसे (शहनाई), हर्षल मानमोडे (ड्रमर), दिपक मौंदेकर, योगेंद्र हटेवार, हर्षल जरवारकर, रोम इंगले व अश्विन लोधे (ढोलक), शुभम गवहाणे (ऑक्टोपॅड) आणि संदेसा (गिटार) यांची साथ लाभणार आहे. प्रवेश विनामूल्य असून कृष्णभक्त, संगीतप्रेमी आणि रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सुरेल सोहळ्याचा आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## पाठपुराव्यानंतर सुरू झालेले आरोग्य केंद्राचे काम पुन्हा बंद!

### राजे रघुजी नगरातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न, शिवसेना महिला आघाडी आक्रमक




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

प्रभाग क्रमांक ३१, राजे रघुजी नगर, सोमवार पेठ येथील आरोग्य केंद्राचे काम सुरू होऊनही ते पुन्हा बंद पडल्याने परिसरातील नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. नागरिकांना आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी शिवसेना महिला आघाडीने सातत्याने पाठपुरावा केला होता. मात्र, काम पुन्हा ठप्प झाल्याने हे काम तातडीने सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे. शिवसेना महिला आघाडीच्या पाठपुराव्यामुळे सदर आरोग्य केंद्राच्या कामाला सुरुवात झाली होती. या केंद्रामुळे परिसरातील नागरिकांना प्राथमिक आरोग्य सेवा स्थानिक पातळीवर उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे हे काम रखडणे नागरिकांच्या दृष्टीने गंभीर बाब असल्याचे शिवसेना महिला आघाडीने म्हटले आहे.

या प्रश्नाकडे तातडीने लक्ष वेधण्यासाठी शिवसेना महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख मनीषा पापडकर यांच्या नेतृत्वाखाली शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे वैद्यकीय अधिष्ठाता डॉ. राज गजभिये यांची भेट घेऊन निवेदन देण्यात आले. यावेळी उपजिल्हाप्रमुख मंजुषा पानबुडे, उपजिल्हाप्रमुख सुषमा इंगोले, विधानसभा संघटक नैना दीक्षित आणि उपजिल्हाप्रमुख मनीषा पराड़ उपस्थित होत्या. आरोग्य केंद्राचे काम कोणत्याही कारणाने रखडता कामा नये. नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित असलेले हे काम तातडीने सुरू करून निर्धारित वेळेत पूर्ण करावे, अशी ठाम मागणी यावेळी करण्यात आली. आरोग्य केंद्राचे काम तातडीने सुरू करून ते पूर्ण करण्यासाठी संबंधित यंत्रणेला आवश्यक निर्देश देण्यात यावेत, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. जनतेच्या आरोग्याच्या प्रश्नांसाठी आणि विकासकामांसाठी शिवसेना महिला आघाडीचा सातत्यपूर्ण पाठपुरावा सुरूच राहणार असल्याचे मनीषा पापडकर यांनी स्पष्ट केले.

## बोरगावजवळ भीषण अपघात, २२ वर्षीय युवक गंभीर जखमी

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

पोलीस स्टेशन सावनेर हद्दीतील बोरगाव येथील एचपी पेट्रोल पंपाजवळ रात्री साडेअकराच्या सुमारास अपघाताची घटना घडली. या



अपघातात दीपांशू मनोहर गायधने (वय २२, रा. पांढुर्णा, मध्य प्रदेश) हा युवक गंभीर जखमी झाला. अपघाताची माहिती मिळताच सामाजिक कार्यकर्ते हितेश बनसोड यांनी सावनेर पोलीस उपविभागाचे उपविभागीय अधिकारी सागर खर्डे सर यांना माहिती देण्यात आली , सावनेर पोलीस तसेच महामार्ग पोलीस यांना घटनेची माहिती देण्यात आली. माहिती मिळताच पोलीस व महामार्ग पोलीस घटनास्थळी दाखल झाले. दरम्यान, हितज्योती आधार फाउंडेशनच्या टीम सदस्यांनी आणि हितेश बनसोड यांनी कोणत्याही नातेवाईकाची वाट न पाहता जखमी युवकाला तातडीने सावनेर शासकीय रुग्णालयात दाखल केले. प्राथमिक तपासणीनंतर जखमीची प्रकृती चिंताजनक असल्याने पुढील उपचारासाठी नागपूर मेडिकल हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले.

दीपांशू हा कळमेश्वर येथून पांढुर्णा जात असताना हा अपघात झाला. जखमीला तातडीने उपचार मिळावेत यासाठी हितज्योती आधार फाउंडेशनने दाखवलेली तत्परता कौतुकास्पद ठरली. यावेळी आकाश यादव, आर्यन कातकडे आणि नरेंद्र समंदुरकर यांनीही मोलाची मदत केली.अपघाताचे नेमके कारण काय, याबाबत सावनेर पोलीस पुढील तपास करीत आहेत.

# गाळे व खुले भूखंडाच्या थकीत मालमत्ता कर वसुलीसाठी जप्तीची कारवाई

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**



दिनांक १ सप्टेंबर २०२६ महानगरपालिका आयुक्त यांच्या निर्देशानुसार धरमपेठ झोन अंतर्गत मालमत्ता कर वसुलीची प्रभावी कार्यवाही सुरू असून, थकीत मालमत्ता कर असलेल्या खुले भूखंडधारकांविरुद्ध आज दिनांक १ सप्टेंबर २०२६ रोजी वॉरंट बजावून जप्तीची कारवाई करण्यात आली.

धरमपेठ झोन अंतर्गत वार्ड क्र. ६८(२), धावळा परिसरातील सुयोग सोसायटी, खसरा क्रमांक ७२ व ७३ येथील अध्यक्ष ॲड. वसंतराव आसोले, राजकुमार रामकृष्ण येरणे, लिंता केवलराम मेश्राम, राहुल कुमार जयप्रकाश मेहता आणि ज्योती कुमारी, गिरीष राधावल्लभ पुरोहीत आणि हितेश किशन बालानी, मधूसुधन जनराव कोल्हे, कुष्णराव गोविंदराव गावंडे, अंकुर अनिल रामटेके यांच्या मालकीचे एकूण १९ खुले भूखंड असून, त्यांच्याकडे मालमत्ता कराची एकूण रु. २६,७२,१६२/- इतकी थकबाकी आहे. सदर खुले भूखंड वॉरंट बजावून जप्त करण्यात आले आहेत.

तसेच वार्ड क्रमांक ६८(३) येथील पंकज नंदलाल अग्रवाल (मेहाडिया) यांच्या मालकीच्या खुले भूखंडावर रु. २६,२५,७२२/- इतकी मालमत्ता कराची थकबाकी असून, सदर खुले भूखंडही वॉरंट बजावून जप्त करण्यात आले आहेत.

याशिवाय वार्ड क्रमांक ६८(३), प्रशांत शंकरराव काळे यांच्या खुले भूखंडावर रु. ३,१५,२२८/- इतकी मालमत्ता कराची थकबाकी असल्याने सदर भूखंड वॉरंट बजावून जप्त करण्यात आला आहे. तसेच वार्ड क्र. ६६, ए. एस. शिन्दे यांचा गाळा रू. १०३८९०१/- व एन कुमार यांचे १३,९७,३३०/-इतकी मालमत्ता कराची थकबाकी असल्याने सदर गाळे वॉरंट बजावून जप्त करण्यात आला आहे. वरील जप्त केलेल्या मालमत्तांची नियमानुसार पुढील कार्यवाही करून लिलावाद्वारे विक्री करण्यात येणार आहे, जेणेकरून महानगरपालिकेची थकीत मालमत्ता कराची रक्कम वसूल करता येईल. हि कारवाई मा. आयुक्त, महानगरपालिका, नागपूर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली या कारवाई दरम्यान धरमपेठ झोनचे सहा. आयुक्त तसेच झोनचे अधिक्षक, कर निरीक्षक तसेच कर संग्राहक यावेळी उपस्थित होते.

महानगरपालिकेतर्फे सर्व मालमत्ताधारकांना आवाहन करण्यात येते की, आपली मालमत्ता कराची थकबाकी तातडीने भरून महानगरपालिकेच्या जप्ती व लिलावासारख्या कठोर कारवाईपासून टाळावे. अन्यथा नळ कनेक्शन व इतर सेवा खंडीत करण्यात येणार आहे.

## माजी सैनिकांच्या पाल्यांसाठी पंतप्रधान शिष्यवृत्ती, अर्ज सादर करण्याचे आवाहन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर :** केंद्रीय सैनिक मंडळ, नवी दिल्ली यांच्यातर्फे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी राबवण्यात येणाऱ्या पंतप्रधान शिष्यवृत्ती योजनेसाठीची प्रकरणे (अर्ज) संकेतस्थळावर सादर करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. नागपूर जिल्ह्यातील माजी सैनिक, विधवा आणि त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या पाल्यांनी यासाठी विहित मुदतीत अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर आनंद पाथरकर (नि.) यांनी केले आहे. इयत्ता बारावी किंवा पदविका (डिप्लोमा) परीक्षेत ६० टक्के किंवा त्याहून अधिक गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रथम किंवा द्वितीय वर्षात प्रवेश घेतलेल्या माजी सैनिक आणि विधवा यांच्या पाल्यांना ही वार्षिक शिष्यवृत्ती दिली जाते. या योजनेअंतर्गत विद्यार्थिनींना वार्षिक ३६ हजार रुपये, तर विद्यार्थ्यांना वार्षिक ३० हजार रुपये शिष्यवृत्ती मिळते. पात्र विद्यार्थ्यांनी आपले अर्ज ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत www.ksb.gov.n या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने सादर करणे आवश्यक आहे. अभ्यासक्रमांची सूची तसेच योजनेच्या सविस्तर माहितीसाठी संबंधित संकेतस्थळावर भेट द्यावी.

## पवित्र पोर्टलवरील हिंदी माध्यमाच्या पात्रता यादीतील त्रुटी दुरुस्तीची मागणी

### हिंदी माध्यमाच्या उमेदवारांवर अन्याय टाळून पात्र उमेदवारांना न्याय देण्याची शिक्षण विभागाकडे मागणी



**दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा**

शिक्षक भरती प्रक्रियेत हिंदी माध्यमाच्या पदांसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या शैक्षणिक पात्रतेसंदर्भात पवित्र पोर्टलवर झालेल्या त्रुटींची तातडीने दुरुस्ती करून पात्र उमेदवारांची यादी पुन्हा तपासावी, अशी मागणी हिंदी माध्यमातील उमेदवारांनी जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडे निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनानुसार, काही उमेदवारांचे इयत्ता १० वीपर्यंतचे शिक्षण मराठी माध्यमातून झाले असले, तरी त्यांनी D.Ed./B.Ed. हिंदी माध्यमातून पूर्ण केले आहे. अशा उमेदवारांची हिंदी माध्यमातील शिक्षक पदासाठीची शैक्षणिक पात्रता व संबंधित नियमांनुसार तपासणी होणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. तसेच इतर माध्यमांच्या उमेदवारांसाठी संबंधित माध्यमाची निवड करण्याचा स्पष्ट पर्याय उपलब्ध असताना हिंदी माध्यमाच्या उमेदवारांसाठीही समान निकष लागू करावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. विशेषतः एसएससीमध्ये दुसरी भाषा म्हणून मराठी विषय घेतलेल्या उमेदवारांच्या बाबतीत माध्यमाच्या पात्रतेबाबत अन्याय होऊ नये, याकडेही लक्ष वेधण्यात आले आहे. निवेदनात गोंदिया जिल्हा परिषदेमधील हिंदी माध्यमाच्या इयत्ता ६ वी ते ८ वीच्या रिक्त पदांमध्ये गणित, विज्ञान, सामाजिक शास्त्र आणि हिंदी भाषा या विषयांचा समावेश असल्याचे नमूद करून, उपलब्ध पदांवर पात्र उमेदवारांना संधी देण्याची मागणी करण्यात आली आहे.

पवित्र पोर्टलवरील पात्रता यादीची सखोल छाननी करून, नियमबाह्य अथवा चुकीच्या पद्धतीने झालेली निवड असल्यास शासनाच्या नियमानुसार योग्य कार्यवाही करावी आणि पात्र उमेदवारांना न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. तसेच निवड प्रक्रियेतील त्रुटी तातडीने दूर करून यादीत आवश्यक सुधारणा करण्याची विनंती करण्यात आली आहे. पात्र उमेदवारांवर अन्याय होऊ नये आणि शिक्षक भरती प्रक्रिया पारदर्शक व नियमबद्ध पद्धतीने पार पडावी, अशी अपेक्षा हिंदी माध्यमातील उमेदवारांनी व्यक्त केली आहे.

## पर्यावरण शुद्ध व सुकर ठेवण्याचा धारिवाल इन्फ्रास्ट्रक्टर लिमिटेडचा पुढाकार प्रशंसनीय!

### चंद्रपूर जिल्हाधिकारी वसुमना पंत यांचे प्रतिपादन, धारिवाल इन्फ्रास्ट्रक्टर लिमिटेडच्या अरण्यगर्भ, घनवन (मियावाकी धर्तीवर) आधारित संकल्पनेचा उद्घाटन सोहळा संपन्न

**दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर**



एखादा उद्योग हा केवळ आपल्या उत्पादणावर लक्ष केंद्रित करीत नसून पर्यावरणाच्या रक्षणाकरिता "मियावाकी फॉरेस्ट" (घनवन उद्यान) हि संकल्पना घेत विविध प्रकारची वृक्ष व औषधीयुक्त वनस्पतींची लागवड करित आहे हि नक्कीच एक समाधानाची बाब आहे. पर्यावरणाला जिवलग मित्र समजणारे उद्योग पाहून अतिशय आनंद झाला असे भावोद्गार जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी वसुमना पंत यांनी काढले. धारिवाल इन्फ्रास्ट्रक्टर लिमिटेड च्या ३.२ एकर क्षेत्रात होत असलेल्या अरण्यगर्भ मियावाकी फॉरेस्टच्या धरतीवर उभा असलेला घनवन उद्यान उदघाटन प्रसंगी त्या बोलत होत्या.

धारिवाल इन्फ्रास्ट्रक्टर लिमिटेड च्या वतीने पूर्वी १.५ एकर क्षेत्रात केलेल्या वृक्षारोपण व ३.२ क्षेत्रात लागवड केलेल्या १८,००० वृक्षारोपण कार्यक्रमाचे उदघाटन जिल्हाधिकारी वसुमना पंत यांनी केले. प्रसंगी उद्योगाचे प्लांट हेड देवेश कुमार, महाव्यवस्थापक पुंडलिक वानवे, उपमहाव्यवस्थापक दिनेश गाखर, श्रीकांत श्रीवास्तव, अमोल गिरडकर, उपव्यवस्थापक रवी चावरे यांची विशेष उपस्थिती होती.

वृक्षारोपण, त्यांचे संवर्धन करून पर्यावरण शुद्ध व सुकर ठेवणे हि आज काळाची गरज आहे. पर्यावरण सदैव समाजास नेहमीच देत आले याचे कर्ज आपण केवळ वृक्ष लागवड व त्याचे संगोपन करूनच फेडू शकतो. उद्योग हा केवळ उत्पादनासाठी नाही तर पर्यावरण समृद्ध ठेवण्यासाठी ओळखला जावा. प्रदूषण कमी करण्यात उद्योगाची भागीदारी असेल तर प्रदूषण मुक्त क्षेत्र घडविण्यास नक्कीच मदत होईल असेही यावेळी जिल्हाधिकारी यांनी आपल्या संबोधनातून सांगितले.

घनवन मियावाकी फॉरेस्ट हि संकल्पना प्रत्यक्षात साकार करण्यासाठी उद्योग चमूने अत्यंत प्रभाविपणे व तळमळीने हे कार्य केले असून आज उभे असलेले हे उद्यान त्यांच्या मेहनतीचे प्रतीक असल्याचे प्लांट हेड देवेश कुमार यांनी यावेळी आपल्या संबोधनातून सांगितले. उद्योग व्यवस्थापन भविष्यात वृक्षारोपण विषयी अधिक प्रभावी पद्धतीने कार्य करणार असल्याची माहिती यावेळी त्यांनी दिली.

या उद्घाटन सोहळ्याला उपमहाव्यवस्थापक भूपेंद्र तोमर, मुख्य व्यवस्थापक संदीप ठाकरे, मनोज कुमार, डॉ. अनिष नायर, सौगतो मुखर्जी, संजीत रावत, व्यवस्थापक सुरेश देवांगन, हेमंत निमकर, संतोष काकडे, हर्षल फुलबांधे, उपव्यवस्थापक हर्ष तोमर यांची व अन्य अधिकाऱ्यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

# महिलांच्या उत्साहाला मिळाला श्रावणी साज, 'महापौर श्रावण उत्सव' रंगला आनंदात

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**



श्रावण महिन्याच्या निमित्ताने महिलांना दैनंदिन जबाबदाऱ्यांमधून विरंगुळ्याचे क्षण मिळावेत, त्यांना आपल्या मैत्रिणींसोबत मनमोकळेपणाने आनंद लुटता यावा आणि महिला सक्षमीकरणाचा संदेश अधिक प्रभावीपणे समाजापर्यंत पोहोचावा, या उद्देशाने नागपूर महानगरपालिकेतर्फे 'महापौर श्रावण उत्सव सोहळा' आयोजित करण्यात आला. धनसंस लॉन, वर्धमान नगर चौक येथे आज (ता.०१) पार पडलेल्या या सोहळ्याला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या सोहळ्यास मनपा महापौर निता ठाकरे, उपमहापौर लिला हाथीबेड, आमदार कृष्णा खोपडे प्रामुख्याने उपस्थित होते. विशेष म्हणजे, श्रावण उत्सवासाठी सत्तापक्ष नेते नरेंद्र(बाल्या) बोरकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

कार्यक्रमात महापौर निता ठाकरे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांनी महिलांच्या प्रेरणेतून अशा कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी प्रेरणा मिळत असल्याचे सांगितले. तसेच दैनंदिन आयुष्यात चार क्षण सुखाचे अनुभवता यावे व त्याचा आनंद लुटता यावा याकरीत श्रावण उत्सव आयोजित करण्याचे करता आल्याचे समाधान व्यक्त केले.

महापौर निता ठाकरे यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या उपक्रमात महिलांसाठी विविध मनोरंजनात्मक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल होती. श्रावण महिन्याचा उत्साह, पारंपरिक वेशभूषा, गीत-संगीत आणि विविध स्पर्धांमुळे संपूर्ण वातावरण उत्सवी झाले.

श्रावण हा केवळ धार्मिक विधी आणि उपवासाचा महिना नसून, भारतीय संस्कृतीतील उत्सवप्रियता आणि स्त्रीशक्तीचा सन्मान करणारा काळ आहे. कुटुंब, मुलं आणि नोकरी-व्यवसायाच्या जबाबदाऱ्या सांभाळताना महिलांना स्वतःसाठी वेळ मिळावा, त्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळावे आणि त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलावा, या भावनेतून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

**महिलांसाठी आनंदाचे व्यासपीठ**

आमदार कृष्णा खोपडे यांनी महिलांनी या सोहळ्याचा मनसोक्त आनंद घ्यावा, असे आवाहन केले. महिलांसाठी नागपूर शहरातील सर्व सहाही विधानसभा मतदारसंघांमध्ये विविध कार्यक्रम आयोजित केले गेले असल्याचेही त्यांनी सांगितले. महिला शक्ती, महिला जागरूकता, महिला सशक्तीकरणाचा हा कार्यक्रम असल्याचे ते बोलले. तसेच त्यांनी आयोजनकांबद्दल सत्तापक्ष नेते नरेंद्र (बाल्या) बोरकर यांच्या प्रयत्नांचा विशेष उल्लेख करीत आयोजकांना शुभेच्छा दिल्या.

क्रीडा विशेष समिती सभापती दर्शनी धवड यांनी सांगितले की, श्रावण महिन्यापासून सण-उत्सवांची मालिका सुरू होते. या पार्श्वभूमीवर महिलांसाठी नेहमीपेक्षा काहीतरी वेगळे आणि आनंददायी आयोजन करण्याचा प्रयत्न करण्यात आला. अशा उपक्रमांमधून महिलांना उत्साह, सकारात्मक ऊर्जा आणि आनंद मिळतो, असे त्यांनी नमूद केले. तर आयोजनासाठी सत्तापक्ष नेते नरेंद्र(बाल्या) बोरकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभल्याचे त्यांनी सांगितले.

**स्पर्धा, नृत्य आणि संगीताने वाढवली रंगत**

कार्यक्रमातील विविध स्पर्धांनी महिलांचा उत्साह द्विगुणित केला. 'श्रावण क्वीन', 'फुल राणी', 'तुझी माझी जोडी' आणि 'रंग माझा हिरवा' या स्पर्धांना महिलांचा विशेष प्रतिसाद मिळाला. याशिवाय श्रावण गीतांचे सादरीकरण, नृत्य, विविध खेळ, फॅशन शो आणि मनोरंजनपर उपक्रमांमुळे कार्यक्रमाला उत्सवी रंगत आली. विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांचा यावेळी गौरव करण्यात आला. जिंकलेल्या महिलांना पैठणी देऊन सन्मानित करण्यात आले.

थोडक्यात


## महादुला आदर्शनगर घोगली ते गुमथला रोडपर्यंत ७.५ किमी विलेज रोडचे डांबरीकरण होणार

**दै. सिंहवाणी वृत्त, कोराडी-मिलिंद गाडेकर**

महादुला आदर्शनगर, घोघली ते गुमथला पर्यंत ७.५ की.मी रोडचे यापूर्वी पंतप्रधान ग्रामसडक योजनेतून काम झालेले होते. मात्र या रोडची थीकनेस फारच कमी असल्याने ४ वर्षातच या रोडची दुर्दशा झाली असल्याने ठिकठिकाणी मोठेमोठे खड्डे पडलेले आहेत. रोडच्या दोन्ही बाजूला रोडचे डांबर निघाले आहे. समोरून चारचाकी अवजड वाहन आले असता दुचाकीस्वार रोड च्या बाजूला वाहन घेत असतांना स्लिप होऊन पडतात. एकंदरीत हा मार्ग धोकादायक ठरत असल्याने दक्ष पत्रकार संघाने याची दखल घेत याबाबत घोगली मधील नागरिकांच्या सह्यांचे निवेदन महसूलमंत्री महाराष्ट्र शासन तथा पालकमंत्री नागपूर, यांना कोराडी देवीमंदिर जनता दरबारात देऊन मंत्रीमहोदयांनी त्यांच्या तक्रारीची तातडीने दखल घेतली आहे. दक्ष पत्रकार संघाचे मिलिंद गाडेकर यांनी आपल्या निवेदनात म्हटले की, आदर्शनगर महादुला, कोराडी, बोखारा या मोठ्या गावातील लोक घोगली मार्गाने गुमथळा व्हाया गुमथी प्राथमिक आरोग्य केंद्र हे ग्रामीण गरीब जनतेचे स्वास्थ केंद्र आणि माता बालसंगोपन केंद्र असल्याने ग्रामीण जनता आरोग्य सुविधांसाठी नेहमीच गुमथी येथे येणे-जाणे करतात शिवाय घोगली, गुमथला बैलगाडा येथील दुग्ध व्यवसाय करणारे दररोज दूध देण्यासाठी कोराडी, महादुला, कॉलनी येथे येतात. शेतकरी वर्ग विद्यार्थी शिक्षण घेण्यासाठी येतात.

रोड अतिशय खराब असल्याने जागोजागी खड्डे पडल्याने अपघात होतात. तसेच महादुला, घोगली मार्गाने १०चक्क ट्रक ची अवजड वाहतूक ही रात्रंदिवस चालते, याबाबत मागील ग्रामसभेत ठराव घेऊनही कारवाही शून्य आहे. म्हणून सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प अंतर्गत ५०५४ योजनेतून या रोडचे तत्काळ प्राकलन तयार करावे, नागरिकांच्या दृष्टीने हा व्हिलेज रोड महत्त्वाचा असल्याने शक्य तितक्या लवकर बजेट बनवून काम सुरू करावे असे निर्देशित केले आहे. यात ग्रामपंचायत सदस्य चक्रधर राऊत, संदीप नारे, उद्देश राऊत, काकडे (गुमथला), गुणवंत राऊत, नरेश कुहिते, भागवत सनोदिया, नमामू साहू, शरद मिरे संजय बावनकर, भेंडारकर, योगेश मेश्राम, तिवारी, प्रियांका आरखेल ताई, भंडारी, संकेत चौधरी, संतलाला दमाहे, बाल्या मॅडम नूतन राऊत, राजू उदापूरे, पन्नालाल दमांहे, राजेश टाटीपामुलवार, पिंटू वडील, आसतकर बाबाजी, चावरिया जी, दामुभाऊ क्षीरसागर, मंदा गोंडाने, मनोहर लांजेवार, डॉ. हरिणखेडे आदी नागरिकांनी स्वाक्षरी केल्या आहेत.

## वैश्विक काव्यसंवेदनांचा सर्जनशील संवाद : सावन धर्मपुरीवार यांच्या 'टिपणवही'चे प्रकाशन



**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

भाषा, देश आणि काळाच्या सीमा ओलांडून मानवी संवेदनांचा वैश्विक अनुभव देणाऱ्या इंग्रजी कवितांना मराठी भाषेचा सर्जनशील स्पर्श देणाऱ्या डॉ. सावन गिरीधर धर्मपुरीवार यांच्या 'टिपणवही' (देशोदेशीच्या इंग्रजी कवींच्या कवितांचे रूपांतरण) या अनुवादित काव्यसंग्रहाचे प्रकाशन महाराष्ट्र राज्याचे राज्यमंत्री नामदार आशिष जयस्वाल यांच्या हस्ते नुकतेच रामटेक येथे संपन्न झाले. वर्णमुद्रा पब्लिशर्स, शेगाव यांच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यास विद्यासागर शिक्षण संस्थेच्या सचिव अनिता जयस्वाल प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. विद्यासागर कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश सोमकुवर तसेच महाराष्ट्रातील नामवंत कवी, साहित्यिक व समीक्षक डॉ. गिरीश सपाटे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मान्यवरांनी डॉ. सावन धर्मपुरीवार यांच्या साहित्यिक, संशोधनात्मक आणि अनुवाद कार्याचे कौतुक केले. विविध भाषांतील साहित्यकृतींचा आशय, सौंदर्य आणि संवेदनशीलता मराठी वाचकांपर्यंत पोहोचविण्यात अनुवादाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. 'टिपणवही' हा संग्रह मराठी वाचकांना जागतिक इंग्रजी कवितेचा समृद्ध आस्वाद देणारा असून, मराठी अनुवाद साहित्यामध्ये त्याची मोलाची भर पडल्याचे उपस्थितांनी नमूद केले. डॉ. सावन धर्मपुरीवार हे रामटेक येथील विद्यासागर कला महाविद्यालयात गेल्या २२ वर्षांपासून इंग्रजी विषयाचे प्राध्यापक व विभागप्रमुख म्हणून कार्यरत आहेत. इंग्रजी व मराठी भाषेचे अभ्यासक, संशोधक, लेखक, कवी आणि अनुवादक म्हणून त्यांनी स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या विविध साहित्यकृतींसह मराठी व इंग्रजी भाषेतील नऊ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. रा. तु. म. नागपूर विद्यापीठाचा उत्कृष्ट शिक्षक-लेखक पुरस्कार (२०२१), अभिरुची गौरव पुरस्कार (२०१४) आणि नॅशनल नवोदय-पुरस्कार (२०२६) यांसह विविध सन्मानांनी त्यांना गौरविण्यात आले आहे.

'टिपणवही'मध्ये २२ नामवंत इंग्रजी कवींच्या एकूण ७० कवितांचा समावेश आहे. वैश्विक काव्यसंवेदना आणि मराठी भाषा यांच्यातील हा सर्जनशील संवाद हीच 'टिपणवही'ची खासियत आहे. विशेष म्हणजे पुस्तकाचे आकर्षक मुखपृष्ठ धर्मपुरीवार यांनी आपल्या कोलाज चित्राच्या माध्यमातून साकारले आहे या पुस्तकाच्या प्रकाशनामुळे साहित्यिक व सांस्कृतिक क्षेत्रात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, साहित्यप्रेमींमध्ये या पुस्तकाविषयी विशेष उत्सुकता दिसून येत आहे.

## सोने खरेदी थांबवा, परदेशवारी टाळा

**मॉस्को :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्हीडीओ शेअर करत देशाचा आर्थिक विकास दर ७.८ टक्क्यांवर गेल्याचा दावा केला आहे. एकीकडे हा दावा करत असताना दुसरीकडे पंतप्रधान मोदी यांनी देशवासीयांना काही सल्लेही दिले आहेत. त्यामुळे आर्थिक विकास दराच्या दाव्यांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. भारताने नोंदवलेल्या ७.८ टक्के आर्थिक विकासदराबद्दल देशवासीयांचे अभिनंदन. भारताला आत्मनिर्भर बनवण्यासाठी स्वदेशीचा मंत्र स्वीकारणे आणि स्थानिक उत्पादनांना प्राधान्य देणे गरजेचे आहे. नागरिकांनी अनावश्यक खरेदी टाळावी आणि गरज नसेल तर सोने खरेदी करू नका असे पंतप्रधान मोदींनी म्हटले आहे. आत्मनिर्भर भारत बनणे अत्यंत आवश्यक आहे. स्वदेशीचा मंत्र आणि लोकल फॉर व्होकलचा विचार स्वीकारला पाहिजे. परदेशात केवळ फिरण्यासाठी जाणे टाळावे. तसेच लग्नसमारंभासाठीही परदेशाऐवजी भारतालाच प्राधान्य द्यावे, असे आवाहन केले आहे.

# नागपूर दक्षिण-पश्चिम मतदारसंघासाठी मतदार सुनावणीची ठिकाणे जाहीर

### विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम-२०२६ अंतर्गत प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आल्यावर आता मतदारांच्या नोंदीतील त्रुटी व विसंगती दूर करण्यासाठी ३१ ऑगस्ट ते २९ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत सुनावणी घेण्यात येणार असून, यासाठी सहायक मतदार नोंदणी अधिकारी, संबंधित भाग क्रमांकांची यादी तसेच सुनावणीची ठिकाणे जाहीर करण्यात आली आहेत.

ज्या मतदारांच्या नोंदींची २००२ च्या तपशिलाशी जुळवाजुळव झालेली आहे, अशा मतदारांची प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली असून ५२ नागपूर दक्षिण-पश्चिम विधानसभा मतदारसंघातील सर्व नागरिकांनी या यादीत आपले नाव तपासून घ्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे. या प्रारूप यादीत नाव नसलेल्या मतदारांनी मतदार नोंदणी अधिकारी कार्यालयात किंवा निवडणूक आयोगाच्या




अधिकृत संकेतस्थळावर जाऊन नमुना क्रमांक ६ भरून नावनोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम २००२ मधील नोंदींचा अभिलेख न मिळालेले मतदार तसेच ज्यांच्या तपशिलात विसंगती आढळली आहे, अशा मतदारांच्या सुनावण्या सहायक मतदार नोंदणी अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली मतदारसंघात निश्चित केलेल्या विविध केंद्रांवर पार पडणार आहेत. यासाठी संबंधित भाग क्रमांक आणि ठिकाणांची सविस्तर यादी जाहीर करण्यात आली आहे. या सुनावणीदरम्यान आवश्यक कागदपत्रे सादर करून त्रुटींची पूर्तता करणाऱ्या पात्र मतदारांची नावे अंतिम मतदार यादीत समाविष्ट केली जातील. त्यानंतर ४ नोव्हेंबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाईल.

## वासुदेव बोडखे यांचा सेवापूर्ती सोहळ्यात गौरवाचा वर्षाव

**कर्तव्यपलीकडील प्रामाणिक कामाची सर्व समाजाकडून दखल, सेवानिवृत्तीनंतर वासुदेव बोडखे यांचे शाळांना लाखोचे दान, गरजू शाळांना विनामूल्य शैक्षणिक सेवा देण्याचीही घोषणा, चार जिल्हा परिषद शाळांना १ लाख २५ हजार रुपयाची भरघोस मदत**

**दै. सिंहवाणी वृत्त, कोंढाळी**




जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, खंडाळा येथील मुख्याध्यापक वासुदेव सोनिराम बोडखे प्रदीर्घ सेवेतून सेवानिवृत्त झाले. मात्र, सेवानिवृत्ती म्हणजे शिक्षणसेवेचा शेवट नसून समाज व विद्यार्थ्यांप्रती असलेली बांधिलकी कायम ठेवण्याचा नवा संकल्प असल्याचे त्यांनी कृतीतून दाखवून दिले. त्यामुळे त्यांचे कर्तव्या पलीकडे केल्या कामाचा उपस्थित मान्यवरांनी मार्गदर्शनातून गौरव केला. आपल्या सेवानिवृत्तीनिमित्त त्यांनी जिल्हा परिषद क्षेत्रातील विविध शाळांना एकूण १ लाख २५ हजार रुपयांचा निधी देऊन शैक्षणिक क्षेत्राप्रती असलेली आपली कृतज्ञता व्यक्त केली. त्यांच्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

वासुदेव बोडखे यांच्या सेवापूर्ती व अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन नुकतेच तिरुपती सभागृह, काटोल येथे करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सामाजिक कार्यकर्ते हेमंत कावडकर तर प्रमुख अतिथी म्हणून नगर परिषद उपाध्यक्ष संदीप वंजारी, शिक्षण सभापती विजय महाजन, बांधकाम सभापती गणेश चन्ने, समाजसेवक किशोर रेवतकर,माजी गटशिक्षणाधिकारी तुकाराम चापले, माजी प्राचार्य प्रभाकर भस्मे, माजी प्राचार्य विजय येणुरकर आणि प्रा. परेश देशमुख, हेमराज सावरकर, शिक्षण विस्तार अधिकारी संजय चिखले, केंद्रप्रमुख राजू धवड, केंद्रप्रमुख राजेंद्र सावरकर प्रामुख्याने उपस्थित होते.

सेवानिवृत्तीनिमित्त वासुदेव बोडखे यांनी जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, सोनोली यांना ५१ हजार रुपये, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, परसोडी (बुवा) यांना ५१ हजार रुपये, जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, फेटरी यांना ११ हजार रुपये आणि जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, खानगाव यांना १२ हजार रुपये, असा एकूण शाळांना १ लाख २५ हजार रुपयांचा निधी धनादेशाद्वारे प्रदान केला. तसेच महाराष्ट्र राज्य सेवानिवृत्त शिक्षक संघटना, काटोल शाखेला ११ हजार रुपयांची देणगी देण्यात आली.

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, शाळांमधील भौतिक सुविधांची उभारणी, क्रीडा स्पर्धा, व अमरफंड योजना, याकरीता हा निधी देत असल्याचे बोडखे यांनी सांगितले. विशेष म्हणजे, सेवानिवृत्तीनंतरही आपली शिक्षणसेवा सुरूच ठेवण्याचा निर्धार त्यांनी यावेळी व्यक्त केला. खानगाव केंद्रातील ज्या शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता असेल, त्या शाळांमध्ये शैक्षणिक सत्र संपेपर्यंत आपण विनामूल्य सेवा देणार असल्याची घोषणा त्यांनी केली. त्यांच्या या निर्णयातून विद्यार्थ्यांप्रती असलेली तळमळ आणि शिक्षण क्षेत्राशी असलेली नाळ अधोरेखित झाली.

सेवाकाळात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच शाळांच्या विकासासाठी योगदान देणाऱ्या बोडखे यांनी सेवानिवृत्तीच्या प्रसंगीही शाळांना निधी देत 'सेवा संपली तरी शिक्षणसेवा थांबत नाही'हा आदर्श घालून दिला. त्यांच्या या उपक्रमातून समाजातील इतर सेवाव्रती व्यक्तींनाही प्रेरणा मिळेल, असा सूर उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विवेक बोरकर, सूत्रसंचालन लता ढोबळे व सविता दुहीजोड तर आभार प्रदर्शन डॉ. राजेंद्र टेकाडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. योगेश चरडे, विरेंद्र वाघमारे ,डॉ. महेंद्र साव, डॉ. दिगंबर टुले, नारायण कावडकर, कमलेश सोनकुसळे,शत्रुघ्न पराते, दुर्गासिंग राठोड, ज्ञानेश्वर मोहोड, दिलीप केने,वंदना घोरमाडे, ओमिका चापले, साक्षी सरोदे,राजेंद्र बोरकर यांनी सहकार्य केले.

## आमदार चरणसिंग ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व फळे वाटप

**आमदार चरणसिंग ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व फळे वाटप**

**दै. सिंहवाणी वृत्त, मेंढला**



काटोल विधानसभा क्षेत्राचे लोकप्रिय आमदार चरणसिंग ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टी जलालखेडा मंडळ तसेच भाजपा युवा मोर्चा नागपूर ग्रामीण (काटोल) यांच्या वतीने पेट मुक्तापूर येथील जिल्हा परिषद शाळेत सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय बुक तसेच फळांचे वाटप करण्यात आले. वाढदिवसाचा आनंद सामाजिक बांधिलकी जपत विद्यार्थ्यांसोबत साजरा करण्यात आल्याने या उपक्रमाचे ग्रामस्थांकडून कौतुक करण्यात आले.

विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध व्हावे, त्यांच्यामध्ये शिक्षणाची गोडी निर्माण व्हावी तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. शालेय साहित्य आणि फळे मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले. समाजातील विविध घटकांनी पुढाकार घेऊन विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत केल्यास त्याचा त्यांच्या शैक्षणिक वाटचालीवर सकारात्मक परिणाम होतो, असा संदेशही या उपक्रमातून देण्यात आला.

यावेळी भाजपा युवा मोर्चा नागपूर ग्रामीण (काटोल)चे सचिव तुषारजी राऊत, जलालखेडा मंडळाचे उपाध्यक्ष अरुण भाऊ कुमारिया, युवा मोर्चा जलालखेडा मंडळाचे अध्यक्ष ज्ञानेश्वर मानकर, गाव अध्यक्ष सुजल वानोडे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रशांतजी खाडे, गुड्डू भाऊ शेंडे उपस्थित होते. तसेच जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक भागवत सर, बोरकर सर, शेळके सर, केदार मॅडम, अंगणवाडी सेविका वानोडे मॅडम, वनिता मोरे यांच्यासह भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार चरणसिंग ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळाले असून, सामाजिक कायार्तून वाढदिवस साजरा करण्याचा आदर्श यानिमित्ताने निर्माण झाला आहे. भविष्यातही विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी विविध उपक्रम राबविण्याचा मानस उपस्थित पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

## सावनेरच्या दादाजी मंदिर परिसरात घराला आग, नगरपरिषदेच्या तत्परतेने आग आटोक्यात

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

सावनेर पोलीस स्टेशनच्या हद्दीत येणाऱ्या दादाजी मंदिर परिसरातील एका घराला आज अचानक आग लागल्याची घटना घडली. सदर घर वर्मा यांचे असल्याची माहिती आहे. घटनेची माहिती सामाजिक कार्यकर्ते हितेश बनसोड यांना मिळताच त्यांनी तत्काळ सावनेरचे रउद्धड सागर खर्डे तसेच नगरसेवक महेश चकोले यांना माहिती दिली. त्यानंतर सावनेर नगरपरिषद प्रशासनालाही घटनेची माहिती देण्यात आली.



माहिती मिळताच सावनेर पोलीस, नगरसेवक महेश चकोले तसेच सावनेर नगरपरिषदेचा स्टाफ घटनास्थळी दाखल झाला. नगरपरिषद सावनेर च्या अग्निशमन विभागाचे फायर ऑफिसर निखिलेश वाडेकर, शुभम गोलाईत, कृणाल बांबल, अतुल ठाकरे, सूरज ढोके, प्रेमचंद चव्हारे आदी कर्मचाऱ्यांनी तत्परतेने कार्यवाही करत आग आटोक्यात आणून पूर्णपणे विझवली. हीतज्योती आधार फाउंडेशन टीम मदतीला वेळीच मिळालेल्या माहितीमुळे आणि प्रशासनाच्या तत्परतेमुळे आग नियंत्रणात आणण्यात यश आले. आगीचे नेमके कारण तसेच झालेल्या नुकसानीचा तपशील अद्याप समोर आलेला नाही.

## जानेवारी ते जूनदरम्यान सेवानिवृत्त होणाऱ्या शिक्षकांना वेतनवाढीचा मार्ग मोकळा

**शिक्षक समितीच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश, शिक्षणाधिकाऱ्यांकडून गटशिक्षणाधिकाऱ्यांना आवश्यक कार्यवाहीचे आदेश**

**दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा**

जानेवारी ते जून या कालावधीत सेवानिवृत्त होणाऱ्या शिक्षकांना वेतनवाढीचा लाभ मिळण्याचा मार्ग आता मोकळा झाला असून, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश आले आहे. या निर्णयामुळे सेवानिवृत्तीच्या उंबरठ्यावर असलेल्या शिक्षकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

शिक्षकांच्या न्याय्य हक्कांसाठी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने हा प्रश्न सातत्याने प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिला होता. १७ जून २०२६ रोजी कोल्हापूर खंडपीठाच्या निर्णयासह संबंधित शासन निर्णयांचा संदर्भ देत, जानेवारी ते जूनदरम्यान सेवानिवृत्त होणाऱ्या शिक्षकांना वेतनवाढीचा लाभ देण्याची मागणी शिक्षणाधिकाऱ्यांकडे करण्यात आली होती.

या मागणीची प्रशासनाने सकारात्मक दखल घेतली असून, शिक्षणाधिकारी पवन खंडारे यांनी सर्व गटशिक्षणाधिकाऱ्यांना पत्राद्वारे आवश्यक कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत, अशी माहिती महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे जिल्हाध्यक्ष संदीप तिडके यांनी दिली.

सेवानिवृत्तीच्या उंबरठ्यावर असलेल्या शिक्षकांना त्यांच्या सेवाकाळातील वेतनवाढीपासून वंचित राहावे लागू नये, तसेच सेवानिवृत्तीनंतर मिळणाऱ्या विविध आर्थिक लाभांवरही त्याचा सकारात्मक परिणाम व्हावा, यासाठी शिक्षक समितीने हा प्रश्न गांभीर्याने लावून धरला होता.

दरम्यान, शिक्षक समितीच्या वतीने आयोजित धरणे आंदोलनातही या मागणीचा ठामपणे पाठपुरावा करण्यात आला होता. शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांसाठी संघटनेने प्रशासनाशी चर्चा, निवेदने तसेच आंदोलनाच्या माध्यमातून सातत्याने भूमिका मांडली. अखेर या पाठपुराव्याला सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे.

या निर्णयामुळे जानेवारी ते जूनदरम्यान सेवानिवृत्त होणाऱ्या शिक्षकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक वर्षे प्रामाणिकपणे सेवा बजावल्यानंतर सेवानिवृत्त होणाऱ्या शिक्षकांच्या दृष्टीने हा निर्णय अत्यंत महत्त्वपूर्ण मानला जात आहे.

'कामाची शुद्ध नीती, शिक्षकांच्या हक्कासाठी सातत्यपूर्ण कृती' या भूमिकेतून शिक्षक समितीने केलेल्या पाठपुराव्याला मिळालेले हे यश असल्याचे शिक्षक समितीच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.



हा विजय केवळ एका मागणीचा नसून, शिक्षकांच्या हक्कासाठी सातत्याने संघर्ष करणाऱ्या संघटनेच्या प्रामाणिक कार्याचा विजय आहे. शिक्षकांच्या प्रश्नांवर केवळ आश्वासन न देता त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी शिक्षक समिती यापुढेही सातत्याने प्रयत्नशील राहील.

**– संदीप तिडके, जिल्हाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती, गोंदिया**

थोडक्यात

## डॉ. नारायण हार्डीकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त काँग्रेस सेवादलाचा कार्यक्रम



**दै. सिंहवाणी वृत्त, आमगाव**

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस सेवादलाचे संस्थापक, स्वातंत्र्यसंग्राम सेनानी व माजी खासदार डॉ. नारायण हार्डीकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त आमगाव तालुका काँग्रेस सेवादलाच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. गोंदिया जिल्हा काँग्रेस सेवादलाचे जिल्हाध्यक्ष जमीलभाई खान यांच्या प्रमुख उपस्थितीत खासदार डॉ. नामदेवराव किरसान यांच्या जनसंपर्क कार्यालयात हा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा काँग्रेसचे महासचिव रामसिंग चौहान होते. प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा काँग्रेस सचिव ईशुलाल भालेकर तसेच काँग्रेस सेवादलाचे जिल्हा सचिव बाबूराव कोरे उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना जिल्हाध्यक्ष जमीलभाई खान म्हणाले की, संपूर्ण देशभर डॉ. नारायण हार्डीकर यांची पुण्यतिथी काँग्रेस सेवादलाच्या माध्यमातून साजरी करण्यात येत आहे. त्याच धर्तीवर गोंदिया जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्येही पुण्यतिथीचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. काँग्रेस सेवादलाच्या माध्यमातून शेतकरी, शेतमजूर, बेरोजगार, युवक व विद्यार्थ्यांच्या प्रश्नांसाठी सातत्याने आवाज उठविला जात आहे. तसेच महागाई, डिझेल, पेट्रोल, गॅसच्या वाढत्या किमतींसह केंद्र व राज्य सरकारच्या धोरणांविरोधात जनतेच्या समस्या मांडण्याचे काम सेवादल करीत असल्याचे खान यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांच्या आंदोलनाचा उल्लेख करताना खान यांनी केंद्र सरकारवर टीका केली. देशातील जनतेला आगामी काळात राहुल गांधी यांना पंतप्रधान म्हणून पाहायचे आहे, असा दावा त्यांनी केला. देशात जातीय व सांप्रदायिक तेढ निर्माण करणाऱ्या शक्तींना काँग्रेस सेवादलाच्या माध्यमातून निष्प्रभ करण्यासाठी कार्यकर्त्यांनी संघटितपणे काम करण्याचे आवाहन त्यांनी केले. जिल्हा काँग्रेस सचिव ईशुलाल भालेकर म्हणाले की, जमीलभाई खान यांच्या नेतृत्वाखाली गोंदिया जिल्ह्यात काँग्रेस सेवादल मजबूतपणे कार्यरत आहे. काँग्रेस पक्षाला अधिक सक्षम करण्यासाठी सेवादलाच्या प्रत्येक रचनात्मक उपक्रमाला पुढे नेण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. महिला काँग्रेसच्या तालुका अध्यक्षा व जिल्हा परिषद सदस्या छबुताई ऊईके, सिद्धेंद्र ठाकूर, जिल्हा काँग्रेस सचिव यादवराव भोयर आणि आमगाव तालुका काँग्रेस सेवादलाचे अध्यक्ष राधेलाल रहांगडाले यांनीही यावेळी विचार व्यक्त केले.

कार्यक्रमाला काँग्रेस सेवादलाचे जिल्हा महासचिव बाबूराव कोरे, सचिव अंकेशकुमार गायधने, जगन कोरे, शब्बीर खान, लतीफ खान, महासचिव डॉ. गोरेलाल बिसेन, राजकुमार चौहान, रंजीत फरदे, दिगंबर कोरे, योगराज मारवाडे, अभयकुमार ढेगे, उमाकांत ऊईके, काँग्रेस अनुसूचित जाती विभागाचे अध्यक्ष पिंकेश शेडे, देवानंद गायकवाड, श्यामराव भंडारकर, शहराध्यक्ष देवकांत बहेकार, जयकुमार मिश्रा, केसरीचंद्र रहांगडाले, शामराव भाडारकर, हंसराज जोशी, प्रभुदास मर्सकोले, नारायण भेलवे यांच्यासह काँग्रेस सेवादलाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन आमगाव तालुका काँग्रेस सेवादलाचे अध्यक्ष राधेलाल रहांगडाले यांनी केले, तर बाजार समिती सदस्य महेश ऊईके यांनी आभार मानले.

## शिवसेनेने सहाय्यक आयुक्त, सभापतींपुढे मांडल्या प्रभाग २९ व ३४ मधील समस्या

### सभापती ज्योती देवघरे यांचा सत्कारही केला





**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

आज दक्षिण नागपूर शिवसेनातर्फे प्रभाग २९ व ३४ मधील स्थानिक नागरिकांच्या मागणीवरून हनुमान नगर झोन सहायक आयुक्त तसेच सभापती यांना प्रभागातील समस्यांचे निवारण करणे हेतू विधानसभा अध्यक्ष विशाल कोरके यांच्या नेतृत्वात उपशहर प्रमुख धम्मा सोनटक्के व महिला शहर संघटिका नीलिमाताई शास्त्री यांच्यातर्फे निवेदन देण्यात आले असून सहाय्यक आयुक्त बावनकर व सभापती ज्योतीताई देवघरे यांना प्रभागातील समस्या जसे कचरा गाडी नियमित न येणे, सफाई कर्मचारी नियमित येत नाही, पावसाळ्याचे दिवस असताना अजूनही फॉगिंग झालेली नाही. मोठ्या प्रमाणात रोडवर अतिक्रमण झालेले आहे. सफाई कर्मचारी नागरिकांशी वाद घालतात उद्यानातील झाडे,गवत मोठे झालेले आहे, अशा अनेक समस्या झोनमधे मांडल्या असता सभापती यांनी तात्काळ समस्येचे निवारण करण्याचे आश्वासन दिले.

तसेच हनुमान नगर झोन सभापती ज्योतीताई देवघरे यांचे दक्षिण नागपूर शिवसेनेद्वारे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी प्रामुख्याने विधानसभा संघटक विशाल कोरके, उपविभाग प्रमुख राकेश भोंदले, विनोद चकोर, अतुल डहाके, आझाद सिंह ठाकूर, रत्नाकर कांबळे, धवणे साहेब, विशाल मानकर, शुभम राऊत, पंकज ढोबळे, प्रीती विशाल मानकर सुषमा कांबळे रंजना राऊत आदि उपस्थित होते.

## कारच्या धडकेत स्कुटीचालक विद्यार्थिनी ठार

**नांदेड :** स्कुटीला पाठीमागून भरधाव कारने जोरदार धडक दिल्याने एलएल.बी. द्वितीय वर्षात शिक्षण घेणाऱ्या २० वर्षीय विद्यार्थिनीचा दुदैवी मृत्यू झाला. ही घटना मंगळवारी (दि. १) रोड क्रमांक २६ वर घडली. या अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. मृत विद्यार्थिनीचे नाव मानसी संजयकुमार जाधव (वय २०, रा. विष्णुनगर) असे आहे. मानसी ही नारायणराव चव्हाण लॉ कॉलेजमध्ये एलएल.बी.च्या द्वितीय वर्षात शिक्षण घेत होती. मंगळवारी १ सप्टेंबर रोजी सकाळी ती घरून स्कुटीवरून कॉलेजला जाण्यासाठी निघाली होती.

# सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या पुढाकाराने 'ज्ञानेश्वर माऊली विद्वत परिषद'

### संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या ७५० व्या जयंती वर्षानिमित्त राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाची आयोजनासाठी निवड

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या ७५० व्या जयंती वर्षानिमित्त महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने राज्यभर विविध सांस्कृतिक व वैचारिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत नागपूर येथे आयोजित करण्यात आलेल्या 'ज्ञानेश्वर माऊली विद्वत परिषद २०२६' या महत्त्वपूर्ण वैचारिक कार्यक्रमासाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाची विशेष निवड करण्यात आली. सांस्कृतिक कार्य विभाग सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे दि. ३१ ऑगस्ट रोजी अंबाझरी मार्गावरील गुरुनानक भवन येथे या विद्वत परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.

परिषदेचे उद्घाटन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. अखिलेश पेशवे यांच्या हस्ते झाले. प्रमुख अतिथी म्हणून लेखक, चिंतक व सेवानिवृत्त होमगार्ड कमांडंट तथा पोलीस महासंचालक डॉ. भूषणकुमार उपाध्याय (आयपीएस) उपस्थित होते. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. सोपानदेव पिसे तसेच आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. समित माहोरे उपस्थित होते.

ज्ञानेश्वरीमध्ये माणसाचे मन, भावना आणि विचार बदलण्याची ताकद असल्याचे प्रतिपादन डॉ. भूषणकुमार उपाध्याय यांनी केले. आज भविष्य, समस्या, पैसा, पायाभूत सुविधा, निवास अशा विविध कारणांमुळे समाज तणावात आहे. विशेषतः तरुणांच्या मनातील तणाव दूर करण्यासाठी आपल्या संतपरंपरेतील तत्त्वज्ञानाचा उपयोग होऊ शकतो, असे त्यांनी सांगितले.

संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीच्या माध्यमातून मानवी मनाचा अत्यंत सखोल विचार केला आहे. ज्ञान, वैराग्य, योग आणि प्राणायामाच्या माध्यमातून मनावर नियंत्रण मिळविण्याचा मार्ग ज्ञानेश्वरीतून सांगितला आहे. ज्ञानेश्वरीतील प्रत्येक शब्द आणि वाणीमध्ये असलेली सकारात्मक ऊर्जा मनावरील ताण कमी करण्यास सहाय्यभूत ठरू शकते, असेही त्यांनी नमूद केले.

भारतीय पोलीस सेवेत असताना पंढरपूर येथे झालेल्या नियुक्तीचा अनुभव सांगताना त्यांनी वारकरी संप्रदायाची सेवा आणि वारीच्या माध्यमातून शरीर व मनाला मिळणाऱ्या आनंदाचा उल्लेख केला. संत ज्ञानेश्वर माऊलींचे विचार हे केवळ एका



संप्रदायापुरते मर्यादित नसून संपूर्ण मानवतेच्या कल्याणाचा मार्ग दाखविणारे आहेत, असे त्यांनी स्पष्ट केले. माहितीला विवेकाची जोड मिळाली तर ज्ञान निर्माण होते आणि ज्ञानाला करुणेची जोड मिळाली तर मानवता निर्माण होते, असे डॉ. उपाध्याय यांनी सांगितले.

**ज्ञानेश्वरांच्या विचारांत जीवनातील प्रश्नांची उत्तरे : डॉ. पेशवे**

विद्वत परिषदेचे उद्घाटन करताना प्र-कुलगुरू डॉ. अखिलेश पेशवे यांनी संत ज्ञानेश्वरांच्या विचारांचे आजच्या जीवनातील महत्त्व अधोरेखित केले. आयुष्यातील प्रश्नांना सामोरे जाणे, अपमान पचविणे, ध्येय निश्चित करणे आणि प्रतिकूल परिस्थितीतही कार्यरत राहणे याचे मार्गदर्शन संत ज्ञानेश्वरांच्या कार्यातून मिळते, असे त्यांनी सांगितले.

संत ज्ञानेश्वरांच्या ७५० वर्षांच्या वैचारिक परंपरेसोबत महाराष्ट्राच्या संतपरंपरेचा समृद्ध वारसा आपल्या मनात आणि आत्म्यात जिवंत आहे. महाराष्ट्र शासनाच्या वतीने आयोजित या महत्त्वपूर्ण विद्वत परिषदेच्या आयोजनाचा मान राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाला दिल्याबद्दल त्यांनी सांस्कृतिक कार्य विभाग सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे आभार मानले.

**संतपरंपरेचा विचार समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न**

प्रास्ताविकात राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. सोपानदेव पिसे यांनी सांगितले की, संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या ७५० व्या जयंती वर्षानिमित्त महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने राज्यातील निवडक विद्यापीठांमध्ये विद्वत परिषदा आयोजित करण्यात येत आहेत. त्यामध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाची निवड करण्यात आली आहे. या परिषदेच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या संतपरंपरेतील विचारांची मांदियाळी, संत साहित्याचा वारसा आणि संत ज्ञानेश्वरांचे मानवतावादी विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न असल्याचे डॉ. पिसे यांनी सांगितले.

**ज्ञानदेवे रचिला पाया ते ज्ञानेश्वरीचे आधुनिक अनुबंध**

पहिल्या सत्रात डॉ. राजेंद्र नाईकवाडे यांनी ज्ञानदेवे रचिला पाया, तर आशुतोष अडोणी यांनी ज्ञानेश्वरीचे आधुनिक अनुबंध या विषयांवर विचार मांडले. ज्ञानदेव हे मराठी संस्कृतीचे मानदंड असून त्यांनी अध्यात्मिक लोकशाहीची मुहूर्तमेढ रोवली. मराठी भाषेतील आद्य कवी व पहिले भाष्यकार म्हणून त्यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. वारकरी संप्रदायाच्या विचारांचा पाया आणि विविध संतांच्या विचारांचा उद्गम संत ज्ञानदेवांच्या कार्यात दिसतो, असे डॉ. नाईकवाडे यांनी सांगितले.

आशुतोष अडोणी यांनी ज्ञानदेवांच्या साहित्य निर्मिती मागील प्रयोजन स्पष्ट करताना ज्ञानेश्वरीतील विचारांची आजच्या कृत्रिम बुद्धिमत्ता आणि तंत्रज्ञानाच्या युगाशी सांगड घातली. आजच्या तरुणांच्या मनातील अस्थिरता, प्रश्न आणि संभ्रम यांची उत्तरे ज्ञानेश्वरीतील विचारांमध्ये सापडू शकतात, असे त्यांनी सांगितले.

**ज्ञानेश्वरांचे अध्यात्म आणि मानवतावाद**

दुसऱ्या सत्रात डॉ. माया पराते-रंभाडे यांनी संत ज्ञानदेवाचे प्रभावक्षेत्र, तर प्राचार्य डॉ. अरविंद देशमुख यांनी ज्ञानेश्वरांचे अध्यात्म आणि मानवतावाद या विषयांवर विवेचन केले. संत ज्ञानदेवांचे प्रभावक्षेत्र केवळ वारकरी संप्रदाय किंवा तत्कालीन संतपरंपरेपुरते मर्यादित नसून आजच्या प्रत्येक व्यक्तीच्या जीवनाला स्पर्श करणारे आहे, असे डॉ. माया पराते-रंभाडे यांनी सांगितले. प्राचार्य डॉ. अरविंद देशमुख यांनी संत ज्ञानेश्वरांच्या अध्यात्मातील मानवतावादी दृष्टिकोनावर प्रकाश टाकला. जीवनाला योग्य दिशा देण्यासाठी संतविचारांची आवश्यकता, मनाची एकाग्रता, जीवनाचे सार त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करत डॉ. संजय सिंगनजुडे यांनी आभार मानले. उद्घाटन सत्राचे सूत्रसंचालन डॉ. अमृता इंदूरकर यांनी केले. कार्यक्रमास विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणांचे सदस्य, विभागप्रमुख, शिक्षक, विद्यार्थी तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी आणि स्वयंसेवक उपस्थित होते.

## भात, तूर व कापूस पिकात निळे-पिवळे चिकट सापळे; रोग-किडीच्या नियंत्रणासाठी प्रभावी उपाय

### कापूस, तूर पिकात चिकट सापळ्यांचा वापर, किडींच्या नियंत्रणासाठी शेतकऱ्यांना मार्गदर्शन



**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

भात, तूर आणि कापूस पिकांमध्ये विविध किडींचा प्रादुर्भाव वाढत असल्याने शेतकऱ्यांनी एकात्मिक कीड व्यवस्थापनाचा अवलंब करणे गरजेचे आहे. यामध्ये निळे व पिवळे चिकट सापळे हे किडींचे निरीक्षण आणि नियंत्रणासाठी उपयुक्त ठरत आहेत.

पिवळ्या रंगाच्या चिकट सापळ्यांकडे मावा, पांढरी माशी, तुडतुडे आणि इतर रसशोषक किडी आकर्षित होतात. त्यामुळे भात, तूर व कापूस पिकांमध्ये किडींच्या प्रादुर्भावाचे निरीक्षण करण्यासाठी पिवळे चिकट सापळे वापरता येतात. कापूस पिकामध्ये विशेषतः रसशोषक किडींच्या हालचालीवर लक्ष ठेवण्यासाठी त्यांचा उपयोग केला जातो.

निळ्या रंगाच्या चिकट सापळ्यांचा उपयोग प्रामुख्याने फुलकिडे (थ्रिप्स) यांच्या निरीक्षण व नियंत्रणासाठी केला जातो. पिकामध्ये सापळे योग्य उंचीवर लावल्यास प्रौढ किडी त्यावर चिकटून अडकतात. त्यामुळे किडींची संख्या कमी करण्यास तसेच प्रादुर्भावाची सुरुवातीची माहिती मिळण्यास मदत होते.

**रोग नियंत्रणासाठीही अप्रत्यक्ष फायदा**

चिकट सापळे हे मुख्यतः किडींचे निरीक्षण व नियंत्रण करण्यासाठी वापरले जातात. किडींचा प्रादुर्भाव कमी झाल्यास त्यांच्या माध्यमातून पसरणाऱ्या काही विषाणूजन्य रोगांचा धोका कमी करण्यास मदत होऊ शकते. मात्र बुरशीजन्य किंवा जिवाणूजन्य रोगांचे थेट नियंत्रण चिकट सापळ्यांद्वारे होत नाही. त्यासाठी पिकानुसार शिफारशीत रोग व्यवस्थापन पद्धतींचा अवलंब करणे आवश्यक आहे.

शेतकऱ्यांनी पिकाची नियमित पाहणी करून सापळ्यांवर आढळणाऱ्या किडींची संख्या तपासावी. किडींचा प्रादुर्भाव वाढल्यास कृषी विभागाच्या शिफारशीनुसार पुढील उपाययोजना कराव्यात. अनावश्यक कीटकनाशक फवारण्या टाळून एकात्मिक कीड व्यवस्थापन, जैविक उपाय आणि आवश्यकतेनुसार रासायनिक नियंत्रण यांचा योग्य समन्वय साधण्याचे आवाहन सहाय्यक कृषी अधिकारी शाश्वती डोफे व समुह सहाय्यक धनश्री निघोट यांनी केले आहे.

निळे व पिवळे चिकट सापळे हे कमी खर्चात किडींचे निरीक्षण करण्यासाठी उपयुक्त साधन असून, भात, तूर आणि कापूस उत्पादकांनी त्यांचा योग्य पद्धतीने वापर करून पीक संरक्षण व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## मी पासून आपण कडे नेण्याचे प्रभावी साधन सामुदायिक प्रार्थना ग्रामगीताचार्य मुक्ता : काळबांडे



**दै. सिंहवाणी वृत्त, अमरावती**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारांमध्ये सर्वधर्मीय सामुदायिक प्रार्थना केवळ धार्मिक विधीचे स्वरूप नसून समाजाला एका विचाराने व एका भावनेने जोडण्याचे माध्यम आहे सामुदायिक प्रार्थना सामाजिक एकता,विश्वबंधुत्व भावना आणि मानवतेचा संदेश साधण्याचे व व्यक्तीपेक्षा समाज,भेदापेक्षा बंधुभाव आणि मी पासून आपण कडे नेण्याचे प्रभावी साधन असल्याचे प्रतिपादन ग्रामगीतचार्य मुक्ता काळबांडे यांनी सामुदायिक प्रार्थनेत अशोक पार्क येथे केले.

गुरुदेव सेवा मंडळ श्रीरामपूर वतीने पुसद तालुक्यात विविध ठिकाणी ५१ सर्वधर्मीय सामुदायिक प्रार्थना व भजन संध्या उपक्रमास उस्फुर्त प्रतिसाद मिळत असून यावेळी शिवालय मंदिर अशोक पार्क पुसद येथे सामुदायिक प्रार्थना व भजन संध्या घेण्यात आली यावेळी चंद्रशेखर शिलाटे,प्रकाश राठोड, ज्ञानेश्वर ढाकूलकर, गजानन इंगळे,तालुका सेवाधिकारी शिवशंकर नागरे, मंडळाचे अध्यक्ष गणेश धर्माळे प्रामुख्याने उपस्थित होते. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते अधिष्ठान पूजन व शिवलिंगाचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला.यानंतर शिस्तबद्ध सामुदायिक प्रार्थना घेण्यात आली यावेळी पुढे त्या म्हणाल्या की आप तेज वायू पृथ्वी आकाश हे पंचमहाभूत मानवास भरभरून देतात त्यामुळे निसर्ग देव आहे तर संतांनी वृक्षांना सोयरे म्हटले आज पर्यावरणाच्या विध्वंसामुळे ऋतू प्रतिकूल आहेत यास आपणच जबाबदार आहोत त्यामुळे व्यस्त जीवनातून समाज राष्ट्र व वसुंधरेस सुजलाम सुफलाम करण्यासाठी प्रयत्न करा, अंधदृष्टी ऐवजी वैज्ञानिक दृष्टी बाळगा, विवेकपूर्ण विचार आत्मसात करा मुलांना संस्कारक्षम बनवा ती खरी संपत्ती आहे. यावेळी त्यांनी ग्रामस्वच्छता, व्यसनमुक्ती,पर्यावरण, संवेदनशीलता यावर प्रकाश टाकला.

## काटोलमध्ये पोक्सोवर विशेष कार्यशाळा

### 'शाळांमध्ये बालसुरक्षेसाठी मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थी प्रतिनिधींना प्रशिक्षण, 'मेरा अधिकार-मेरी सुरक्षा-मेरी जिम्मेदारी'च्या माध्यमातून बालहक्क, लैंगिक अपराध प्रतिबंध, बालविवाह, बालमजुरी व ऑनलाइन सुरक्षेबाबत जनजागृती

**दै. सिंहवाणी वृत्त, काटोल**

बालकांना लैंगिक अपराध, शोषण, हिंसा, बालविवाह, बालमजुरी तसेच ऑनलाइन धोक्यांपासून सुरक्षित ठेवण्यासाठी आणि शाळांमध्ये भयमुक्त व सुरक्षित वातावरण निर्माण करण्याच्या उद्देशाने काटोल येथे पोक्सो अधिनियम, २०१२ तसेच बाल संरक्षण कायद्यांवर विशेष प्रशिक्षण व जनजागृती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

उपविभागीय अधिकारी कार्यालय, प्रशासकीय भवन, तहसील कार्यालय, काटोल येथे ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या प्रशिक्षणात काटोल व



नरखेड तालुक्यातील सरकारी, निमशासकीय, गैरसरकारी, आश्रमशाळा तसेच निवासी विद्यालयांमधील मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, शिक्षक आणि विविध वयोगटातील विद्यार्थी प्रतिनिधींना सहभागी करून घेण्यात आले.

या कार्यशाळेचा प्रमुख संदेश 'मेरा अधिकार-मेरी सुरक्षा-मेरी जिम्मेदारी' हा असून, बालकांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देण्यासोबतच असुरक्षित परिस्थिती ओळखणे, त्याविरोधात आवाज उठवणे आणि योग्य वेळी मदत घेणे याबाबत सक्षम करण्यावर भर देण्यात आला.

कार्यशाळेस महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या सदस्य गीतांजली बुटी यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच उपविभागीय अधिकारी, काटोल पियुष चिवंडे, उपविभागीय पोलीस अधिकारी पराग पोटे, तहसीलदार काटोल श्रीमती आभा वाघमारे, तहसीलदार नरखेड भागवत पाटील, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी मुस्ताक पठाण, पोलीस निरीक्षक रणजित शिरसाठ, बाल विकास प्रकल्प अधिकारी काटोल भारती बोबडे, बाल विकास प्रकल्प अधिकारी नरखेड चौधरी, जिल्हा बालरक्षण समन्वयक, जिल्हा परिषद शिक्षण विभाग प्रसेनजीत गायकवाड आणि संरक्षण अधिकारी (काटोल) चेतन रोंगरे ,चाईल्ड हेल्पलाईन प्रतिनिधी अनिकेत भिवगडे, मंगला टेंभुर्णे यांची उपस्थिती होती.

कार्यशाळेत जिल्हा बाल संरक्षण अधिकारी मुस्ताक पठाण यांनी बालहक्क, पोक्सो अधिनियम, बालकांच्या संरक्षणासाठी आवश्यक उपाययोजना तसेच शाळा, आश्रमशाळा आणि छात्रावासांमध्ये बालसुरक्षा व्यवस्था मजबूत करण्याबाबत मार्गदर्शन केले.

**पोक्सो कायद्याची माहिती प्रत्येक शाळेपर्यंत पोहोचविण्यावर भर**

पोक्सो अधिनियम, २०१२ अंतर्गत बालकांना लैंगिक अपराधांपासून संरक्षण देण्यासाठी असलेल्या कायदेशीर तरतुदी, लैंगिक अत्याचाराची प्रकरणे समोर आल्यानंतर करावयाची कार्यवाही आणि संबंधित यंत्रणांना माहिती देण्याची प्रक्रिया याबाबत शाळा प्रशासनाला मार्गदर्शन करण्यात आले.

बालकांसोबत कोणत्याही प्रकारचे अनुचित वर्तन, लैंगिक शोषण, छेडछाड किंवा अत्याचाराचे प्रकरण घडल्यास ते दडपून न ठेवता तातडीने संबंधित बाल संरक्षण यंत्रणा व पोलिसांना माहिती देणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले. कार्यशाळेचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रवीण चौहान, सहाय्यक यांनी केले.